| 36 | विद्याधर घरत | ३०१, प्रथमेश कृपा, सेंट फ्रांसिस स्कुल नालासोपारा (प) 7798917400 | 3 रे खेला मास्टर्स गेम्स स्टेट चॅम्पियनशीप | जलतरण 50 मी फ्री स्टाईल | 30 नोव्हेंबर ते 01 डिसेंबर 2024 | ब/4 | राज्य | प्रथम | 50000 |
| 37 | विनोद कोरीया | उंगणभाट, नंदाखाल, कोफरड, विरार (प) 8097401474 | 3 रे खेला मास्टर्स गेम्स स्टेट चॅम्पियनशीप | भालाफेक | 30 नोव्हेंबर ते 01 डिसेंबर 2024 | ब/4 | राज्य | प्रथम | 50000 |

**प्रस्तावाचा निर्णय / ठराव :-** प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मागणी अर्ज क्र.01 ते अर्ज क्र.77 अशा एकूण 77 खेळांडूना मा.सर्वसाधारण ठराव क्र.05 दिनांक 14/07/2017 च्या सर्वसाधारण नियमावलीतील अटी व शर्ती नुसार वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या, स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना प्रोत्साहनपर वित्तसहाय्य देणेकामी होणाऱ्या एकूण रुपये रु.41,15,000/- इतक्या रक्कमेस ही सभा मंजुरी देत आहे व त्याकामी होणा-या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

सुचकाचे नाव - श्री सुनिल आचोळकर

व स्वाक्षरी -

अनुमोदकाचे नाव - श्री महेश सरवणकर

व स्वाक्षरी

अनुकूल संख्या ------------------------ प्रतिकुल संख्या---------------------- तटस्थ संख्या--------------------------------

ठराव /सर्वानुमते /बहुमताने /मंजुर /नामंजुर

(प्रविण शेट्टी)
पिठासीन अधिकारी
स्थायी समिती
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, विरार
## स्थायी समिती

ठराव क्र. ९६

दिनांक :-०६/०४/२०२६

---

विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील मा. सर्वसाधारण सभागृह व मा. महापौर सभागृहात, मा. उप. महापौर दालन, मा. विरोधी पक्ष नेता दालन व इतर ठिकाणी यांच्या दालनात टिव्ही युनिट व अनुषंगीक बाबी कार्यान्वित करणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** - वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात यशंवत नगर विरार (प.) येथे, नव्याने तयार करण्यात आलेल्या महापालिकेचे परिवहन भवन तथा मुख्यालय कार्यालयाचे दि.१०/०७/२०२४ रोजी उद्घाटन झाले असून मुख्यालय (पू) येथील सर्व विभाग नविन प्रशासकीय इमारतीमध्ये स्थंलातरीत करण्यात आलेले आहेत.

महानगरपालिकेचे सर्व विभागातील कामकाज मुख्यालयातून होत आहे. तसेच वसई विरार शहर महानगरपालिका महापौर पदाची निवडणूक पार पडली आहे.

त्याअनुषंगाने मा. सर्वसाधारण सभागृह व मा. महापौर सभागृहात घेण्यात येणाऱ्या आढावा बैठक, विविध कामासंबंधातील विभागांच्या इतर महत्तवाच्या बैठक तसेच बैठकी दरम्यान पॉवर पाईंट प्रेझेंटेशन दाखविणेकामी तसेच विविध कामांचे व्हिडीओ व माहिती सादरीकरण करणेकामी टिव्ही युनिट कार्यान्वित करणे उचीत राहिल.

सद्यस्थितीत मा. सर्वसाधारण सभागृहात टिव्ही युनीट कार्यान्वित नाही. तसेच मा. महापौर सभागृहात टिव्ही युनिट बांधकाम विभागामार्फत कार्यान्वित करण्यात आलेले आहे. परंतू सदर टिव्ही ७५ इंच असून त्यावर काही प्रदर्शित केल्यास हॉलच्या कॅपॅसिटी अनुषंगाने सुस्पष्ट दिसत नाही.

सदर ठिकाणी १०० इंच चा टिव्ही बसविणे आवश्यक आहे. जेणेकरुन मा. महापौर सभागृहात दाखविण्यात येणारे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन तसेच विविध कामांचे व्हिडीओ, माहिती सादरीकरण सुस्पष्ट दिसू शकेल. तसेच मा. सर्वसाधारण सभागृह, मा. उप. महापौर दालन, मा. स्थायी समिती सभापती दालन, मा. विरोधी पक्षनेता दालनात देखील टिव्ही युनीट कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने टिव्ही युनिट व अनुषंगीक यंत्रणा कार्यान्वित करणेकामी येणाऱ्या साहित्यांचा व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र. | तपशिल | नग | प्रती नग (सर्व करांसहीत) | एकुण (सर्व करांसहीत) |
|---|---|---|---|---|
| 1 | 253 cm (100 inches) 4K Ultra HD Smart TV | 1 | 269479 | 269479.00 |
| 2 | 138 cm (55 inches) 4K Ultra HD Smart OLED TV | 14 | 61990 | 867860.00 |
| 3 | TV Wall Mount Bracket 55 Inch LED LCD Flat Curved Screen TVs 400x400mm | 5 | 6357 | 31785.00 |
| 4 | Low Height Trolly Monitor Stand with Wheels for 65 inch Flat Curved Screen LCD, Height Adjustable, 90°Adjustable Viewing Angle | 1 | 7500 | 7500.00 |
| 5 | HDMI Matrix 8x8, 4K HDMI Matrix Switch 8 in 8 Out Switcher Splitter Support HDMI2.0 | 1 | 39999 | 39999.00 |
| 6 | Tx/Rx HDMI Extender UltraHD 4K Single CAT6/7 Cable 165 ft- Loop Out | 8 | 4899 | 39192.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | Cat6 SFTP 24AWG Pure Copper Twisted Pair Armored Cable Roll (305 m) | 2 | 31499 | 62998.00 |
| 8 | 6U Wall mount rack | 1 | 5629 | 5629.00 |
| 9 | Setup Box with 1 Year Recharge + Installation up to 50-60 meter | 9 | 5000 | 45000.00 |
| **Total** | | | | **१३,६९,४४२.००** |

उक्त तक्त्यानुसार मा. सर्वसाधारण सभागृह व मा. महापौर सभागृहात, मा. उप. महापौर दालन, मा. विरोधी पक्ष नेता दालन व इतर ठिकाणी यांच्या दालनात टिव्ही युनिट व अनुषंगीक बाबी खरेदी करणेकामी अंदाजित रक्कम रु. १३,६९,४४२/- (सर्व करांसहीत) इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च लेखासांकेतांक क्र. ०४१-४१७२०१, "संगणक साहित्य खरेदी " या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल.

**प्रस्तावाचा निर्णय** – सदर बाबत सभागृहात चर्चा करणेत आली. तरी वसई विरार शहर महानगरपालिकेतील मा. सर्वसाधारण सभागृह व मा. महापौर सभागृहात, मा. उप. महापौर दालन, मा. विरोधी पक्ष नेता दालन व इतर ठिकाणी यांच्या दालनात टिव्ही युनिट व अनुषंगीक बाबी कार्यान्वित करणेकामी व होणाऱ्या अंदाजित रक्कम रु. १३,६९,४४२/- (सर्व करांसहीत) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

---

सूचकाचे नाव – श्री. पंकज पाटील

व स्वाक्षरी

अनुमोदकाचे नाव – श्री. महेश सरवणकर

व स्वाक्षरी

अनुकुल संख्या -------------------- प्रतिकुल संख्या --------------------- तटस्थ संख्या -----------------

(ठराव/सर्वानुमते/बहूमताने/मंजूर/नामंजूर)

(श्री. प्रविण शेट्टी)
सभापती तथा पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
वसई विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

# विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार पश्चिम
## मा.सर्वसाधारण सभा

(७)

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७७ सभा सुचना क्र. सभा दिनांक.०६/०४/२०२६

---

**प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई पश्चिम तांबडीपाडा येथील समाज मंदिरात विविध दुरुस्ती कामे करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे बी-१ निविदा दर मागविणे कामी मान्यता देणे बाबत**

**प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांसाठी सामाजिक, सांस्कृतिक व सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी समाज मंदिर उभारण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सध्या परिसरात अशा प्रकारच्या कार्यक्रमांसाठी योग्य जागा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम आयोजित करण्यास अडचणी येत आहेत.**

**प्रस्तावित समाज मंदिर उभारल्यास नागरिकांना लग्नसमारंभ, सामाजिक कार्यक्रम, शैक्षणिक उपक्रम, बैठका तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी योग्य सुविधा उपलब्ध होतील. यामुळे परिसरातील सामाजिक एकोपा वाढण्यास तसेच नागरिकांना एकत्र येण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध होण्यास मदत होईल.**

**तसेच सदर समाज मंदिरासाठी आवश्यक जागा, अंदाजपत्रक व बांधकामासंबंधी कार्यवाही करणे आवश्यक आहे.**

**वरील बाबींचा विचार करता, नागरिकांच्या सोयीसाठी व सामाजिक हिताच्या दृष्टीने प्रस्तावित समाज मंदिर बांधकामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक आहे.**

**त्यामुळे खालील नमुद कामासाठी बी-१ निविदा दर मागविणे आवश्यक आहे.**

| **अ.क्र.** | **कामाचे नाव** | **अंदाजपत्रकीय रक्कम** |
|---|---|---|
| १ | वसई पश्चिम तांबडीपाडा येथील समाज मंदिरात विविध दुरुस्ती कामे करणे | ६७७५२२ |
| | **एकूण रक्कम** | **रु.६,७७,५२२/-** |

**वरील नमूद कामाचा खर्च " विकास निधी अंतर्गत नाट्यगृहे, सभागृह बांधकाम " या लेखाशिर्ष अंतर्गत भागविण्यात येणार आहे**

**वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई पश्चिम येथील समाज मंदिरात विविध दुरुस्ती कामे करणे कामी एकूण रक्कम रु. ६,७७,५२२/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. वरील नमुद कामांकरीता होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी घेणे आवश्यक आहे**

तरी वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई पश्चिम येथील समाज मंदिरात विविध दुरुस्ती कामे करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकरीताचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेस निर्णयार्थ सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई पश्चिम येथील समाज मंदिरात विविध दुरुस्ती कामे करणे कामी एकूण रक्कम रु. ६,७७,५२२/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यासाठी आजच्या स्थायी समिती सभेसमोर प्रसताव प्राप्त झाला असल्याने सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदर कामी ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-१ पद्धतीने ई-निविदा दर मागविणेस आजची स्थायी समिती सभा मान्यता देत आहे.

---

सुचकाचे नाव :- श्रीम. रंजना थालेकर

सही :- RThalekar

अनुमोदक :- श्री. स्वप्निल कवळी

सही :- [signature]

अनुकुल संख्या------------------------------प्रतिकुल संख्या--------------------------------तटस्थ संख्या------------

(ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर)

[signature]

(प्रविण शेट्टी)
सभापती
स्थायी समिती
वसई विरार शहर महानगरपालिका

---

**(आवश्यक नसेल ते खोडावे)**

(८)

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पश्चिम,**
मा. स्थायी समिती सभा

मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ९८ सभा सुचना क्र. सभा दिनांक :-०६/०४/२०२६

---

**प्रस्तावाचा विषय** :- विरार (पूर्व) मध्ये श्री जिवदानी रुग्णालय येथे आपत्कालीन जिना बनविणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई विरार शहर महानगरपालिका विरार पूर्व मध्ये श्री जिवदानी रुग्णालय येथे आपत्कालीन जिना बनविणे आवश्यक आहे. नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा सुलभपणे उपलब्ध व्हावी, यासाठी संबंधित विभागामार्फत आरोग्य केंद्र सुरू करणे आवश्यक आहे. या आरोग्य केंद्रामध्ये सर्वसामान्य नागरिकांना प्राथमिक उपचार, तपासणी, लसीकरण, माता-बाल आरोग्य सेवा तसेच विविध आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे.

तसेच या आरोग्य केंद्रामुळे परिसरातील नागरिकांना तात्काळ वैद्यकीय सेवा मिळण्यास मदत होईल व शासकीय आरोग्य योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे देता येईल. सदर आरोग्य केंद्रासाठी आवश्यक जागा, वैद्यकीय कर्मचारी व आवश्यक साहित्य उपलब्ध करणे आवश्यक आहे.

वरील बाबींचा विचार करता, नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सदर आरोग्य केंद्र सुरू करण्यास / कार्यान्वित करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

त्यामुळे खालील नमुद कामासाठी बी-१ निविदा दर मागविणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | विरार (पूर्व) मध्ये श्री जिवदानी रुग्णालय येथे आपत्कालीन जिना बनविणे. | रु.४४,८७,९६५/- |

वरील नमूद कामाचा खर्च "विकास निधी अंतर्गत रुग्णालय बांधकामासंबंधी कामे" या लेखाशिर्ष अंतर्गत भागविण्यात येणार आहे

विरार (पूर्व) मध्ये श्री जिवदानी रुग्णालय येथे आपत्कालीन जिना बनविणेकामी एकूण रक्कम रु.४४,८७,९६५/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. वरील नमुद कामांकरीता होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी घेणे आवश्यक आहे

तरी विरार (पूर्व) मध्ये श्री जिवदानी रुग्णालय येथे आपत्कालीन जिना बनविणेकामी होणाऱ्या रक्कम रुपये ४४,८७,९६५/- इतक्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधि. १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याचे अधिकार मा. स्थायी समिती सभेला आहेत. सदरील प्रस्ताव निधी उपलब्धतेच्या

अधीन राहून प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकरीताचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेपुढे ठेवणेस निर्णयार्थ सादर.

**ठराव** :- विरार (पूर्व) मध्ये श्री जिवदानी रुग्णालय येथे आपत्कालीन जिना बनविणेकामी एकूण रक्कम रु. ४४,८७,९६५/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदर कामी ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे बी-१ पध्दतीने ई-निविदा दर मागविणेस मा. स्थायी समिती सभा मान्यता देत आहे.

सुचकाचे नाव :- श्री. कॅरोल डायस

व स्वाक्षरी :- ----------------------------------------

अनुमोदकाचे नांव :- श्रीम. रंजना थालेकर

व स्वाक्षरी :- ----------------------------------------

अनुकुल संख्या ________ प्रतिकुल संख्या ________ तटस्थ संख्या ________

ठराव/सर्वानुमते/बहुताने/मंजुर/नामंजुर

सभापती तथा पिठासीनअधिकारी
स्थायी समिती
वसई-विरार शहर महानगरपालिका

* (आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पश्चिम, जि. पालघर, पिन नं – ४०१३०३
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल –vasaivirarcorporation@yahoo.com

---

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७८
सभा सुचना क्र.

विभाग : सार्व. बांधकाम
दिनांक : ०६/०४/२०२६

---

१) प्रस्तावाचा विषय : वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई पश्चिम नवघर येथील वाचनालय दुरुस्ती करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई – निविदा कार्यप्रणालीद्वारे बी -१ निविदा दर मागविणेकामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

२) अंदाजपत्रकीय रक्कम : रु. ९,९५,९१६/-

३) कामाची आवश्यकता : प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ८५ वाचनालयातील पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील फॉल सिलींग खराब झाली आहे. वाचनालयात मुले अभ्यासिकेत अभ्यास करण्यासाठी येतात व नागरीक पेपर वाचण्यासाठी येतात. मुलांना व नागरीकांना काही इजा होऊ नसे म्हणून फॉल सिलींग दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच बाथरुमची व्यवस्था नाही. वाचनालयात रंगकाम करणे आवश्यक आहे. तसेच तळमल्यावरील भाजी मार्केट शेड व दुसऱ्या मजल्यावरील शेड दुरुस्ती करणे आवश्यक आहे.त्याअनुषंगाने सदर इमारतीच्या सुचविलेल्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तांत्रीक सल्लागार मार्फत तयार करण्यात आले आहे

४) कामाचे स्वरुप : अंतर्गत कामे : रंगकाम, शौचालय दुरुस्ती, फॉल सिलींग, टाइल्स, पत्रा शेड इ.
फॉल सिलींग लांबी २४० चौ.मी.
पेंटींग – १८८ चौ.मी. , पत्रा शेड - ५६५

५) यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- यापुर्वी सदर ठिकाणी मागील ३ वर्षात कुठल्याही प्रकारचे काम झालेले नाही.

६) अर्थसंकल्पीय तरतुद : अ) लेखाशिर्ष :

७) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. अ.क्र. वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(अ) नुसार मा. स्थायी समिती सभेसमोर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव निर्णय** : वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. वरील कामी तयार करणेत आलेल्या रु. ९,९५,९१६/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकात ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. सदर कामी शासनाकडुन अनुदान/ निधी उपलब्ध झाल्यास सदरच्या निधीतुन काम करणेस प्रशासकीय वित्तीय मान्यता देणेत येत आहे. अनुदान/ निधी उपलब्ध न झाल्यास महानगरपालिका निधीतुन सदरचे काम करणेस मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवुन निविदेची कार्यवाही करणेस, तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देणेत येत आहे.

सुचकाचे नांव : श्री. चंद्रशेखर धुरी

व स्वाक्षरी ----------

अनुमोदकाचे नांव : श्री. नरेंद्र पाटील

व स्वाक्षरी ----------

अनुकुल संख्या ________ प्रतिकुल संख्या ________ तटस्थ संख्या ________

ठराव/सर्वानुमते/बहुताने/मंजुर/नामंजुर

(प्रविण शेट्टी)
स्थायी समिती सभापती
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

* (आवश्यक नसेल ते खोडावे)

(१०)

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पश्चिम, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०३
दुरध्वनी क्र. ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**स्थायी समिती सभा ठराव.क्र.** २०
**सभा सुचना क्र.**

**विभाग :- सार्व. बांधकाम विभाग**
**दिनांक.** ०६/०४/**२०२६**

---

**प्रस्तावाचा विषय :-** **वसई- विरार शहर महानगरपालिका विरार (प.) प्रभाग क्र.३४ मध्ये गास मोठामहालपाडा नवापुर येथे समाज मंदिर बांधणे. (मा.आ.श्री. हितेंद्रजी ठाकुर यांच्या फंडाअंतर्गत सन २०२१-२२) कामाच्या सुधारीत मध्ये अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका **विरार (प.) प्रभाग क्र.३४ मध्ये गास मोठामहालपाडा नवापुर येथे समाज मंदिर बांधणे. (मा.आ.श्री. हितेंद्रजी ठाकुर यांच्या फंडाअंतर्गत सन २०२१-२२)** कामास मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांनी रु.५४,००,८२५/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ठराव क्र.१३७३ दि.२८/०३/२०२२ रोजी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदरचे अंदाजपत्रक १२% जी.एस.टी. रक्कमेनुसार बनविण्यात आले होते. तद्नंतर सदर कामास मा.शहर अभियंता ह्यांची दि.२५/०३/२०२२ रोजी रक्कम रु.५४,००,८२५/- इतक्या रक्कमेस तांत्रिक मंजुरी घेऊन ई-निविदा दि.२१/१०/२०२२ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आली. सदर निविदेमध्ये एकूण ०३ निविदाकार प्राप्त झाले असून लघुत्तमं निविदाधारक मे.पार्श्व कोर्पोरेशन ह्यांची (-) ०.१० % कमी दराची निविदा मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांनी ठराव क्र.२३०५ दि.१७/०२/२०२३ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर निविदाकाराकडून २% सुरक्षा अनामत भरुन, करारनामा करुन जा.क्र.वविशम/बांध/२४०५/२०२३ दि.०३/०३/२०२३ अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे.

त्यानुसार प्रत्यक्ष साईटवर काम पुर्ण करण्यात आले आहे. सदरचे अंदाजपत्रक १२ % जी.एस.टी. नुसार करण्यात आले होते. त्यामुळे ठेकेदार मे.पार्श्व कोर्पोरेशन यांना १८ % जी.एस.टी. नुसार वाढीव ६% जी.एस.टी. रक्कम अदा करणे आवश्यक आहे. तसेच सदरच्या कामी अंदाजपत्रकात अंतर्भुत असलेल्या काही बाबींच्या परिमाणात वाढ झाली आहे व काही बाबींच्या परिमाणात बचत झाली आहे. त्यामुळे अंदाजपत्रकाची रक्कम रु.५१,३४,३१२/- इतकी झाली असुन त्यावरील जी.एस.टी. व लेबर इन्शुरन्स यांची रक्कम रु ९,९९,८४८/- अशी एकुण रक्कम रु.६०,८४,१६० इतकी झाली आहे. ठेकेदार मे.पार्श्व कोर्पोरेशन यांना दुस-या व अंतिम देयकापर्यंत मुळ प्रशासकिय रक्कमे इतकी म्हणजेच रु.५४,००,६२५/- इतकी रक्कम अदा केली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पूस्तिका नुसार मुळात मान्यता दिलेल्या प्रस्तावाच्या संबंधात सुधारीत अंदाज अंतिमत:सादर करणे आवश्यक ठरव्याची शक्यता असेलतर, अशा प्रस्तावाच्या फेर बदलाच्या बाबतीत मूळ प्रस्तावाचा खर्च अन्य बाबीवरील बचतीच्या रक्कमेमध्ये भागवण्याची शक्यता असतानाही मूळ प्रस्तावात केलेल्या फेर फाराच्या बाबतीत आणि प्रशासकीय मान्यता मिळालेल्या अंदाजाच्या रक्कमेपेक्षा १०% किंवा १ कोटी यापैकी कमी असेल तितक्या रक्कमेने अधिक असणा-या तपशीलवर अंदाजाच्या बाबतीत सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्याकरिताही लागू करण्यात येईल.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ नूसार नियम क्र.१६७ नूसार मूळ अंदाजाना प्रथम मान्यता देणा-या प्रधिका-याच्या मंजूरी विना मूळ अंदाजपत्रकात काहीही बदल करता येणार नाहीत. अशा फेरबदलास मंजूरी देण्यात असलेल्या अधिका-यांच्या स्वाक्षरीने मंजूर केलेला कोणताही फेरबदल अंदाजामध्ये नमूद करण्यात आला पाहिजे. जेव्हा मूळ अंदाजामध्ये १०% पेक्षा अधिक वाढ होण्याचा संभव असेल अथवा संकल्पचित्रात वा योजनेत फेरबदल प्रस्तावित केला असले अथवा अंशत: काम केल्यावर सोडून देण्यात आलेल्या बांधकामाचे नूतनीकरण करावययाचे असेल तर सुधारीत अंदाज तयार झाले पाहिजेत ते जणू मूळ अंदाज असल्याप्रमाणे मान्यतेपोटी सादर केले पाहिजेत.

ठेकेदार मे.पार्श्व कोर्पोरेशन यांना दुस-या व अंतिम देयकापर्यंत रक्कम रु.५४,००,८२५/- अदा करण्यात आली आहे. तरी उर्वरीत रक्कम रु.६,८३,३३५/- इतकी रक्कम अदा करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम मुळ प्रशासकिय रक्कमेपेक्षा जास्त असल्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कमेची सुधारीत प्रशासकिय व वित्तीय मंजुरी घणे आवश्यक आहे. तरी सदर कामाच्या रक्कम रु.६०,८४,१६०/- इतक्या रक्कमेस सुधारित प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील **विरार (प.) प्रभाग क्र.३४ मध्ये गास मोठामहालपाडा नवापुर येथे समाज मंदिर बांधणे. (मा.आ.श्री. हितेंद्रजी ठाकुर यांच्या फंडाअंतर्गत सन २०२१-२२)** कामाचा कार्यादेश देण्यात येऊन प्रत्यक्ष काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५४,००,८२५/- (तांत्रिक मान्यतेनुसार) प्रत्यक्ष काम करताना साईट वरील गरजेनुसार काम करण्यात आले आहे. तसेच काही बाबींच्या परिमाणात वाढ झाली आहे त्यामुळे प्रत्यक्ष कामाचा खर्च रु.६०,८४,१६०/- इतका झाला आहे. ठेकेदार मे.पार्श्व कोर्पोरेशन हयांना दुस-या व अंतिम देयकापोटी मुळ प्रशासकिय मान्यते इतकी म्हणजेच रक्कम रु. ५४,००,८२५/- रक्कम अदा करण्यात आली आहे. उर्वरित वाढीव रक्कम रु. ६,८३,३३५/- इतकी आहे.तरी रक्कम रु.६०,८४,१६०/- इतक्या रकमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. तसेच त्यानुसार सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेऊन संबंधित निविदेअंतर्गत पुढील कार्यवाही करणेस तसेच त्याअनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.

सुचकाचे नाव :- श्रीम. रंजना थालेकर

सही :-

अनुमोदकाचे नाव :- श्री. स्वप्निल कवळी

सही :-

अनुकुल संख्या ----------------------------------प्रतिकुल संख्या------------------ तटस्थ संख्या-----------

(ठराव / सर्वानुमते / बहुमताने / मंजूर/ नामंजूर)

(प्रविण शेट्टी)
स्थायी समिती सभापती तथा
पिठासीन अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

*( आवश्यक नसेल ते खोडावे )

D:\Prabhag A Bolinj\Prabhag A - Bolinj\Bandhakam 2025\Tipani 2025\Sudharit Tipani & Tharav..docx

# वसई विरार शहर महानगरपालिका

(११)

मुख्य कार्यालय, विरार (प.), जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. - २१

विभाग - पाणीपुरवठा
दिनांक - ०६/०४/२०२६

| | | |
|---|---|---|
| **प्रस्तावाचा विषय** | - | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "ए" बोळींज, विरार कार्यक्षेत्रात म्हाडा स्पोर्ट्स मैदान येथे आयोजित कोकण सरस महोत्सव करिता अंथरण्यात आलेल्या ३" इंची व्यासाच्या जलवाहिनी विषयक कामाकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम -ड प्रकरण ५ संविदा २ (२) नुसार केलेल्या कार्यवाहीस व खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत. |
| **अंदाजपत्रकीय रक्कम** | - | रु. २,५१,९१६/- |
| **प्रस्तावाचा मजकूर** | - | वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती (ए) बोळींज अंतर्गत म्हाडा स्पोर्ट्स मैदान येथे प्रशासनामार्फत कोकण सरस महोत्सवाचे आयोजन दिनांक १२/०३/२०२६ ते दिनांक १६/०३/२०२६ पर्यंत करण्यात आले आहे. सदर महोत्सवामध्ये विविध प्रकारचे अंदाजे ३० फुड स्टॉल व स्थानिक महिला बचत गटांमार्फत तयार करण्यात आलेल्या पदार्थांच्या विक्रीचे स्टॉल लावण्यात आलेले आहेत. सदर स्टॉल करिता पाणीपुरवठा व्यवस्था करणेकामी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ०६/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. |

सदर महोत्सवाकरिता फुड स्टॉलच्या मागील बाजूस जलवाहिनी अंथरुन सदर जलवाहिनीमधून टँकरद्वारे पाणीपुरवठा करणेबाबतच्या सुचना संयुक्त आढावा बैठकीत देण्यात आलेल्या आहेत. तरी सदर महोत्सवाकरिता पाणीपुरवठा विभागामार्फत ठेकेदार श्री. एम.एम.देशमुख प्रा.ली. यांच्याकडून ३" व्यासाची व १०० मी.लांबीची जलवाहिनी अंथरुन घेण्यात आलेली आहे.

सदर कामी प्रभाग समिती "ए" बोळींज कार्यालयाच्या पाणी पुरवठा विभागाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०२३-२४ च्या दरसुचीवर आधारीत रु.२,५१,९१६/- किंमतीचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता तसेच मे. श्री. एम.एम.देशमुख प्रा.ली. यांच्याकडून करून घेतलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यतेची आवश्यकता आहे.

सदर खर्च सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातील "जल व मल प्रवाह निधी" या लेखाशिर्षाअंतर्गत भागविणे शक्य आहे.

तरी सदर केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळावी तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-ड प्रकरण ५ संविदा २ (२) नुसार मे.श्री.एम.एम.देशमुख प्रा.ली. यांच्या सोबत अंदाजपत्रकीय दराने संविदा करण्यास तसेच मंजूर दरानुसार येणाऱ्या एकूण रु. २,५१,९१६/- खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकामी प्रस्ताव मान्यतेकरीता सादर.

ठराव :- **वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "ए" बोळींज, विरार कार्यक्षेत्रात** म्हाडा मैदान येथे आयोजित कोकण सरस महोत्सवाकरिता पाणी पुरवठा करणेकामी ८० मी.मी. जलवाहिनी पुरविणे व अंथरणेकामी रक्कम रु.२,५१,९१६/- **इत्तक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत असुन या ठिकाणी** मे. श्री. एम.एम.देशमुख प्रा.ली. **यांनी केलेले काम तातडीने केले असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम -ड प्रकरण ५ संविदा** २ (२) **नुसार निविदा न काढता नोंदणीकृत ठेकेदार** मे. श्री. एम.एम.देशमुख प्रा.ली. **यांना सदर कामाची संविदा करण्यास मंजूरी देत आहे.**

**सुचकाचे नाव :-** श्री. स्वप्निल कुवळी

**स्वाक्षरी :-**

**अनुमोदकाचे नाव :-** श्री. नरेंद्र पाटील

**स्वाक्षरी :-**

**अनुकुल संख्या-------------------- प्रतिकुल संख्या--------------------- तटस्थ संख्या ----------------------**

**ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर**

**(प्रवीण शेट्टी)**
**पिठासीन अधिकारी**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

(१२)

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार**
**मा. स्थायी समिती सभा**
**सभा सुचना क्र.**

**ठराव क्र. :-** २२

**विभाग :- घनकचरा व्यवस्थापन**
**दिनांक :-** ०६/०४/२०२६

**विषय :-** स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शहराचे स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व २०२६, हागणदारी मुक्त शहर अभियान (ODF), कचरामुक्त शहर अभियान (GFC), नमस्ते (NAMASTE) योजना व Smart City Mission अंतर्गत Urban Outcome Framework चे मुल्यांकनाकामी अनुभवी शहर समन्वयक यांना कंत्राटीतत्वावर नेमण्यास व या कामी येणाऱ्या खर्चास मा. स्थायी समिती सभेपुढे आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालय केंद्र शासनामार्फत सन २०१६ पासून देशातील शहरांमध्ये स्वच्छ सर्वेक्षण सुरु करण्यात आले. महाराष्ट्र राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी या स्वच्छ सर्वेक्षणात भाग घेतला असून यात वसई विरार शहर महानगरपालिकेचा देखील समावेश आहे.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालय केंद्र शासनामार्फत सन २०१६ पासून देशातील शहरांमध्ये स्वच्छ सर्वेक्षण सुरु करण्यात आले. महाराष्ट्र राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी या स्वच्छ सर्वेक्षणात भाग घेतला असून यात वसई विरार शहर महानगरपालिकेचा देखील समावेश आहे.

सन २०१६ च्या स्वच्छ सर्वेक्षणात देशातील १० लक्ष व १० लक्ष पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ७३ शहरांना नेमण्यात आले होते. तद्नंतर दरवर्षी शहरांच्या संख्येत वाढ होत गेली व त्यासोबत सर्वेक्षणाचे निकष ही कठोर होत गेले. शहरांची प्रगती तपासण्यासाठी व प्रोत्साहन देण्यासाठी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण, हागणदारी मुक्त शहर अभियान (Open defecation Free - ODF), कचरामुक्त शहर अभियान (Garbage Free City - GFC) व नमस्ते (नॅशनल ॲक्शन फॉर मेकॅनाइज्ड सॅनिटेशन इकोसिस्टम - NAMASTE) योजना तसेच Smart City Mission अंतर्गत Urban Outcome Framework च्या अनुषंगाने Ease of Living Index (EOI) व Municipal Performance Index (MPI) सर्वेक्षण सुरु करण्यात आले असून महानगरपालिका क्षेत्राचा राहणीमानाचा दर्जाचे मुल्यमापन करुन केंद्र शासनामार्फत निकाल व क्रमांक प्रक्षेपित करण्यांत येत आहेत.

मागील वर्षाची 'स्वच्छ भारत अभियान' व 'City Livability Index Survey/ Urban Outcome Framework - Smart City Mission' मधील वसई विरार शहर महानगरपालिकेची कामगिरी खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र. १**

| वर्षे | सर्वेक्षण | स्वच्छ भारत अभियान अंतर्गत प्राप्त मानांकन | City Livability Index/ Urban Outcome Framework (Smart City) अंतर्गत प्राप्त मानांकन | शेरा |
|---|---|---|---|---|
| सन २०१६ | २०१६ | देशातील ७३ शहरांमध्ये **३५** वा क्रमांक | - | - |

| वर्षे | सर्वेक्षण | स्वच्छ भारत अभियान अंतर्गत प्राप्त मानांकन | City Livability Index/ Urban Outcome Framework (Smart City) अंतर्गत प्राप्त मानांकन | शेरा |
|---|---|---|---|---|
| सन २०१६-१७ | २०१७ | देशातील ४३४ शहरांमध्ये **१३९** वा क्रमांक | - | - |
| सन २०१७-१८ | २०१८ | देशातील ४२०३ शहरांमध्ये **८१** वा क्रमांक | देशातील ११४ शहरांमध्ये २० वा क्रमांक | शहर समन्वयक कु. दिपाली वा. पाटलेकर यांची नियुक्ती करण्यांत आली होती. |
| सन २०१८-१९ | २०१९ | १. देशातील ४२३७ शहरांमध्ये **३६** क्रमांक<br>२. ३ Star GFC मानांकन प्राप्त<br>३. ODF मानांकन प्राप्त | - | |
| सन २०१९-२० | २०२० | १. स्वच्छ सर्वेक्षण २०२० या श्रेणीत देशातील ४,२४२ शहारांमध्ये **३२** वा क्रमांक<br>२. GFC, १ Star प्राप्त<br>३. ODF मानांकन प्राप्त | सर्वेक्षण २०१९ अंतर्गत:<br>१) EOL: या श्रेणीत देशातील ११४ शहरांमध्ये ३९ वा क्रमांक<br>२) MPI: या श्रेणीत देशातील ११४ शहरांमध्ये ४१ वा क्रमांक | |
| सन २०२०-२१ | २०२१ | १. ODF++ मानांकन प्राप्त<br>२. स्वच्छ सर्वेक्षण २०२१ या श्रेणीत देशातील ४३२० शहरांमध्ये **२९** वा क्रमांक प्राप्त.<br>३. सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज या श्रेणीत ४५ शहरांमध्ये २३ वा क्रमांक प्राप्त. | - | शहर समन्वयक कु. दिपाली वा. पाटलेकर व कु. हेमाली ज. पाटील यांची नियुक्ती करण्यांत आली होती. शहर समन्वयक कु. दिपाली वा. पाटलेकर व कु. हेमाली ज. पाटील यांची नियुक्ती करण्यांत आली होती. |
| सन २०२१-२२ | २०२२ | १. ODF++ मानांकन प्राप्त<br>२. स्वच्छ सर्वेक्षण २०२२ या श्रेणीत देशातील ४३५५ शहरांमध्ये **२५** वा क्रमांक प्राप्त. | - | |
| सन २०२२-२३ | २०२३ | १. स्वच्छ सर्वेक्षण २०२३ या मध्ये देशातील ४३५५+ शहरांचा समावेश, दश लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये **३३** वा क्रमांक प्राप्त.<br>२. ODF++ मानांकन प्राप्त. | Urban Outcome Framework २०२२ चे काम पूर्ण झाले असून निकाल बाकी आहे. | |
| सन २०२३-२४, सन २०२४-२५ | २०२४ | १. स्वच्छ सर्वेक्षण २०२४ या मध्ये देशातील ४५८९ शहरांचा समावेश, दश लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये **२९ वा** क्रमांक प्राप्त.<br>२. ODF++ मानांकन प्राप्त. | - | |

| वर्षे | सर्वेक्षण | स्वच्छ भारत अभियान अंतर्गत प्राप्त मानांकन | City Livability Index/ Urban Outcome Framework (Smart City) अंतर्गत प्राप्त मानांकन | शेरा |
|---|---|---|---|---|
| सन २०२५-२६ | २०२५ | स्वच्छ सर्वेक्षण २०२५ चे काम सुरु आहे. | - | |

स्वच्छ भारत अभियान- २ अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व स्मार्ट सिटी मिशन अभियान अंतर्गत "Urban Outcome Framework" चे कामकाज उत्कृष्टरित्या विहित कालावधीत पूर्ण करुन राष्ट्रीय पातळीवर उच्चतम क्रमांक मिळवण्याकरिता मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी प्रशासकिय ठराव क्र. १३०४, दि.०७/१०/२०२५ अन्वये कु. दिपाली वा. पाटलेकर व कु. हेमाली ज. पाटील यांची शहर समन्वयक म्हणून कंत्राटीतत्वावर ६ महिन्याकरिता प्रति माह रु.५५,०००/- प्रत्येकी ठोक वेतनावर माहे सप्टेंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ पर्यंत नियुक्ती करण्यात आली होती. त्यांची मुदत दि. २८/०२/२०२६ रोजी पर्यंत आहे.

स्वच्छ भारत अभियान- २ अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व २०२६, कचरामुक्त शहर (Garbage Free City- 3 Star), हगणदारी मुक्त शहर (Open Defecation Free-ODF++) मानांकनाचे काम तसेच नमस्ते (NAMASTE) योजना राबविणेचे काम सुरु आहे. खालीलप्रमाणे शहर समन्वयक यांच्याकडून काम करुन घेण्यात येत असून पुढील आवश्यक कामे करण्यासाठी त्यांची महानगरपालिकेस आवश्यकता आहे.

- **स्वच्छ भारत अभियान सन २०२५-२०२६ व २०२६-२०२७ अंतर्गत खालील कामे करावयाची आहेत.**

  १. MIS- केंद्र शासनाच्या माहिती व्यवस्थापन प्रणालीवर मासिक अहवाल अद्यावत करणे व तसेच राज्य शासनास वेळोवळी अहवाल सादर करणे.
  २. ODF++ हागणदारी मुक्त शहराची माहिती, दस्ताऐवज व मुल्यांकन सहामाही अद्यावत करुन केंद्र व राज्य शासनास अहवाल सादर करणे.
  ३. GFC-कचरामुक्त शहराची माहिती, दस्ताऐवज व मुल्यांकन करुन वार्षिक अहवाल सादर करुन केंद्र शासनास सादर करणे.
  ४. SS २०२५ व SS २०२६ स्वच्छ सर्वेक्षणाची माहिती दस्ताऐवज व मुल्यांकन करुन तीमाही अहवाल तयार करुन केंद्र शासनास सादर करणे.
  ५. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत विविध उपक्रम राबविणे.

- **स्मार्ट सिटी अंतर्गत Urban Outcomes Framework ची खालील कामे अपेक्षित आहेत.**

  १. EOL- शहरातील सुलभ राहणीमान निर्देशांक दस्ताऐवज तयार करणे व मुल्यांकन अहवाल तयार करुन केंद्र शासनाच्या पोर्टलवर अद्यावत करणे.
  २. MPI- महानगरपालिकेची कामगिरी निर्देशांक दस्ताऐवज तयार करणे व मुल्यांकन अहवाल तयार करुन केंद्र शासनाच्या पोर्टलवर अद्यावत करणे.
  ३. Climate Smart Cities Assessment Framework- दिलेल्या मुद्दयानुसारअहवाल तयार करुन केंद्र शासनाच्या पोर्टलवर अद्यावत करणे.
  ४. सदर माहिती महानगरपालिकेतील विविध विभाग तसेच शहरातील विविध शासकिय संस्था व खाजगी संस्था यांच्याशी समन्वय साधुन माहिती संकलीत करावयाची आहे.

- **नॅशनल ॲक्शन फॉर मेकॅनाइज्ड सॅनिटेशन इकोसिस्टम (NAMASTE) योजने अंतर्गत खालील कामे आहेत.**

    १. राज्य व केंद्र शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक कामांची अंमलबजावणी करुन घेणे.

    २. केंद्र शासनाच्या प्रणालीवर/ ॲप द्वारे सफाई कामगार व कचरा वेचक यांचे योजने अंतर्गत प्रोफाईलींग व नोंदणी करून घेणे.

स्वच्छ भारत अभियान-२ अंतर्गत पुढील स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व २०२६ तसेच स्मार्ट सिटी अंतर्गत Urban Outcomes Framework मुल्यांकनाकामी कु. दिपाली वा. पाटलेकर व कु. हेमाली पाटील यांनी दि. १०/०२/२०२६ रोजीचा अर्ज अन्वये पूढे काम करण्यास इच्छूक असल्याचे कळविले असून त्यांचा शैक्षणिक व अनुभवाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. २**

**१. कु. दिपाली वा. पाटलेकर**

**शैक्षणिक अर्हता :-**

| Sr. No. | Name of Degree | University | Passing | % |
|---|---|---|---|---|
| 1. | B.Sc. Zoology | Mumbai | 2012 | 57.87 |
| 2. | M.Sc. Environmental Sciences | Mumbai | 2014 | 67.33 |

**अनुभव:-**

| Sr. No. | Organization | Post | Period | |
|---|---|---|---|---|
| | | | From | To |
| 1. | i) Klean Environmental Consultant, (HO) Mumbai<br>ii) Klean Laboratories & Research Pvt.Ltd., Tarapur | Environmental Engineer | May 2015 | Sep 2017 |
| 2. | Vasai- Virar City Municipal Corporation | City Co-ordinator (Swachh Bharat Mission & City Livability) | Oct 2017 | Feb 2018 |
| 3. | Vasai- Virar City Municipal Corporation | | Sep 2018 | Feb 2026 |

**तक्ता क्र. ३**

**२. कु. हेमाली ज.पाटील**

**शैक्षणिक अर्हता :-**

| Sr. No. | Name of Degree | University | Passing | % |
|---|---|---|---|---|
| 1. | B.Sc. Zoology | Mumbai | 2016 | 89.38 |
| 2. | M.Sc. Environmental Sciences | Mumbai | 2018 | 70.00 |

**अनुभव :-**

| Sr. No. | Organization | Post | Period | |
|---|---|---|---|---|
| | | | From | To |
| 1. | NABARD Funded Project | SIS | 2017 | 2018 |
| 2. | Ecotech Pvt. Ltd. , Boisar M.I.D.C. | Internal Auditor | May 2018 | Aug 2018 |
| 3. | Panchgani Hill Station Municipal Council | City Co-ordinator (Swachh Bharat Mission) | Oct 2018 | Apr 2019 |
| 4. | Palghar Municipal Council | | Jul 2019 | Oct 2020 |
| 5. | Vasai- Virar City Municipal Corporation | City Co-ordinator (Swachh Bharat Mission & City Livability) | Oct 2020 | Feb 2026 |

स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत तसेच १५ वा वित्त आयोगा अंतर्गत वितरित करण्यात येणारा निधी शहराच्या स्वच्छ सर्वेक्षणात केलेल्या प्रगतीवर व गुणांकनावर अवलंबून आहे. शहर समन्वयक यांनी तक्ता क्र. १ प्रमाणे उत्कृष्ट कामगिरी केली आहे. तसेच स्वच्छ भारत अभियान व स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत नेमून दिलेल्या कामे व्यतिरिक्त स्वच्छ भारत अभियान अंतर्गत प्राप्त अनुदानाचे विनियोग पाहणे व त्याकरिता प्रस्ताव सादर करणे, शासनाने निर्देशित केलेले विविध घटकांसाठी निधी मागणी करिता 'कृती आराखडा' तयार करणे व केंद्र शासनाच्या स्वच्छतम पोर्टल वर सादर करणे, १५ वा वित्त आयोग अंतर्गत प्राप्त अनुदान संबंधित माहिती City Finance पोर्टल वर अद्यावत करणे, घनकचरा व्यवस्थापन विभागा संबंधित माहिती PAS पोर्टल, NCAP पोर्टल, MPCB पोर्टल (वार्षिक अहवाल-Form 4, Form 5) व माझी वसुंधरा पोर्टल वर अद्यावत करणे. तसेच राज्य शासनाद्वारे राबविण्यात येणारे उपक्रम शहरात राबविणे व अहवाल तयार करणे, विभागीय कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम आयोजन करणे, टेंडर तयार करणे व अनुषंगिक कामे करणे, NGT-MPCB अनुपालन अहवाल सादर करणे, Creatives Art Work व pamphlets तयार करणे इत्यादी विविध कामे शहर समन्वयक यांच्या मार्फत पार पाडली जात आहेत. सदर कामकाज प्रत्येकवर्षी केंद्र व राज्य शासनाने दिलेल्या कालमर्यादेत पूर्ण करणेसाठी तसेच उपरोक्त सर्व कामांची माहिती महानगरपालिकेच्या एकुण ११५ वॉर्डनुसार संकलित करणेकरिता दोन शहर समन्वयक यांची वसई विरार शहर महानगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभागास आवश्यकता आहे.

सन २०१४ पासून स्वच्छ भारत अभियान अंतर्गत विविध उपक्रम राबविणे, उघड्यावर शौच बंद करणे, घनकचरा व्यवस्थापन सुधारणे व जनजागृती उपक्रम आयोजित करणे असे आहे. त्याअनुषंगाने दरवर्षी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये स्वच्छ भारत अभियान राबविले जात असून सदरकामी शहर समन्वयक यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. मा. अवर सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.स्वमअ-२०२४/CN७२६०९९/नवि-३४, दि.२० जून २०२५ रोजीच्या पत्रान्वये व स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.), महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र./राअस/शहर समन्वयक/७९६/२५-२६, दि.२०/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कंत्राटी तत्त्वावरील शहर समन्वयक (City Co-Ordinator) यांच्या पद भरतीबाबत निर्देश प्राप्त आहेत. **या पत्रामध्ये ज्या नागरी स्थानीक स्वराज्य संस्थांना शहर समन्वयक पदांची आवश्यकता आहे,** अशा नागरी स्थानीक स्वराज्य संस्थांनी महानगरपालिकेकरिता महानगरपालिका आयुक्त स्तरावर व नगरपरिषद/ नगरपंचायती करिता संबंधित विभागीय आयुक्त यांचे स्तरावर नियुक्ती करणेत यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच

**प्रपत्रानुसार महानगरपालिका आयुक्त यांचे स्तरावर महानगरपालिकांसाठी कमाल दोन शहर समन्वयक यांची नियुक्ती करता येईल असे निर्देश प्राप्त आहेत.** सदर शहर समन्वयक यांची नियुक्ती बाबतचे निर्देश स्वच्छ भारत अभियान राबविणेकामी आहेत. व सदर नियुक्ती करण्यात आलेल्याचा **अहवाल शासनामार्फत शेअर करण्यात आलेल्या गुगल शिट च्या माध्यमातून वेळोवेळी अद्यावत केला जातो.**

नागरी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सन २०१८ मधील जाहीरातीनुसार केवळ "स्वच्छ भारत अभियान" राबविणेकरिता अमृत शहरातील शहर समन्वयक यांचेकरीता रु.५५,०००/- प्रतीमाह प्रति व्यक्ती मानधन निश्चित करण्यात आले होते. परंतु याआधारे **मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ४२ दि.१८/०६/२०१९ अन्वये "स्वच्छ भारत अभियान" सोबत "स्मार्ट सिटी अभियान" अंतर्गत होणाऱ्या मुल्यांकन अशा गृहनिर्माण व शहरी कामकाज मंत्रालय यांनी पारित केलेल्या दोन वेगळ्या अभियान राबविणेकामी शहर समन्वयक यांची नियुक्ती करण्यात आली व रू. ५५,०००/- प्रतिमाह प्रति व्यक्ती मानधन निश्चीत करण्यात आले.** सदर शहर समन्वयकांद्वारे उपरोक्त दोन अभियानाव्यतिरिक्त विविध अहवाल, प्रस्ताव, टेंडर तयार करणे, कार्यक्रम, प्रदर्शने, कार्यशाळा आयोजित विविध शासनाच्या प्रणालीवर माहिती सादर करणे, इ. अन्य कामकाज करण्यात येत आहे. शहर समन्वयक कु. दिपाली व. पाटलेकर व कु. हेमाली ज. पाटील यांची शैक्षणिक पात्रता, कामाचा अनुभव व महानगरपालिकेस यांची झालेली मदत तक्ता क्र. १, २ व ३ मध्ये नमूद केले आहे. या आधारे सदर शहर समन्वयक यांची पुढील नेमणुकी साठी घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

**शहर समन्वयक कु. दिपाली वा. पाटलेकर व कु. हेमाली ज. पाटील यांची तक्ता क्र. २ व ३ अन्वये शैक्षणिक अर्हता व अनुभव पाहता तसेच तक्ता क्र. १ प्रमाणे केलेली उत्कृष्ट कामगिरी नुसार त्यांना पुढील ६ महिन्यांकरिता प्रत्येकी रु. ५५,०००/- प्रति महिना मानधन देऊन कंत्राटी तत्वावर नेमणूक केल्यास महानगरपालिकेस उपयुक्त मदत होणार आहे.** सदरकामी ६ महिन्यांकरिता मानधन/ वेतनावर रु. ६,६०,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सदर खर्च सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातील "घनकचरा व्यवस्थापन योजना अंमलबजावणीकामी सल्लागार नेमणुकीसह इतर महसुली खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध तरतुद मधुन भागविणे शक्य आहे.

सदर दोन्ही शहर समन्वयक दि.२८/०२/२०२६ नंतर १ दिवसाचा सेवा खंड दिला असून तद्नंतर त्या दोन्ही शहर समन्वयक दि.०४/०३/२०२६ ते आजपर्यंत कार्यरत आहेत. त्यांना पुढील ६ महिने कालावधीसाठी म्हणेजच दि.०४/०३/२०२६ ते दि. ३१/०८/२०२६ पर्यंत कु. दिपाली वा. पाटलेकर व कु. हेमाली ज. पाटील यांची "शहर समन्वयक" म्हणून नेमणूक करून मुदतवाढ देणेकामीचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा. सक्षम प्राधिकरणाकडे सादर करणेकामी मुदतीपुर्वी सादर करण्यात आला होता. परंतु, महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक आचारसंहिता लागू झाल्याकारणाने मुदतवाढीस व खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेण्यास विलंब झाला असल्याने व महापालिकेची संभाव्य गैरसोय टाळणेसाठी दोन्ही शहर समन्वयक यांना कार्यरत ठेवण्यात आले असून त्या वरील प्रमाणे कामे करित आहेत. त्याअनुषंगाने मा. स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ नुसार पुढील ६ महिन्यांच्या कालावधीसाठी दि. ०४/०३/२०२६ ते दि. ३१/०८/२०२६ पर्यंत कु. दिपाली वा. पाटलेकर व कु. हेमाली ज. पाटील यांची

"शहर समन्वयक" म्हणून नेमणूक करण्यास तसेच या कामी येणा-या खर्चास कलम ७३ (ड) नुसार मा. स्थायी समिती सभेपुढे कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस पुढील ठराव करण्यात येत आहे.

**निर्णय** :- स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शहराचे स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व २०२६, हागणदारी मुक्त शहर अभियान (ODF), कचरामुक्त शहर अभियान (GFC), नमस्ते (NAMASTE) योजना, स्मार्ट सिटी मिशन अभियान अंतर्गत Urban Outcome Framework मुल्यांकनाकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ नुसार कु. दिपाली वामन पाटलेकर व कु. हेमाली जगदिश पाटील या दोन "शहर समन्वयक" यांना १ दिवसाचा तांत्रिक सेवाखंड देवून पुढील ६ महिने (दि. ०४/०३/२०२६ ते दि. ३१/०८/२०२६) या कालावधी करिता कंत्राटी तत्वावर नेमण्यात येत असून दोन्ही शहर समन्वयाकांच्या मानधन/वेतनापोटी येणाऱ्या रु. ६,६०,०००/- खर्चास मा. स्थायी समिती सभा कार्योत्तर आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

सुचकाचे नाव :- श्री. लॉरेल डायस

व स्वाक्षरी :-

अनुमोदकाचे नाव :- श्री. आलमगीर डायस

व स्वाक्षरी :-

अनुकूल संख्या ......................................प्रतिकुल संख्या ............................. तठस्थ संख्या .................................

ठराव/ सर्वानुमते/ बहुमताने/ मंजूर/ नामंजूर

(प्रविण शेट्टी)
पिठासीन अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

"F:\loukik pc data\लौकिक\DEEPALI Mdm\City Coordinator Contract Renew\10.02.2026 (Mar 26 - Aug 26)\1. Tipani , Sep 2025.docx"

(13)

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पश्चिम, जि. पालघर, पिन नं.४०१३०३**
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रस्ताव ठराव क्र. २३

विभाग : सार्व. बांधकाम
दिनांक : ०६/०४/२०२६

---

**प्रस्तावाचा विषय:** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एफ" अंतर्गत वॉर्ड क्र.४२ अंतर्गत भुमी ऍक्वा ते झाटे कंपाऊंड येथे गटार व रस्ता तयार करणे याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा क्र. | :- | २०२४_VVCMC_१०२९२६१_८ |
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- | रु. २,१३,६१,९७०/- |
| तांत्रिक मान्यता रक्कम | :- | रु. २,१३,६१,९७०/- |
| ई-निविदा रक्कम | :- | रु. २,१३,६१,९७०/- |
| प्रशासकीय मान्यता | :- | मा. आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र. ३०५३ दि. १३/०२/२०२४ |
| तांत्रिक मंजुरी | :- | प्र. शहर अभियंता पृ.क्र. ६५/१२ सन २०२३-२४ दि.०८/११/२०२३ |
| ई -टेण्डरींग निविदा सुचना प्रसिध्दी तारीख | :- | वविशम/बांध/२५१४/२३-२४ दि. ०६/०३/२०२४ |
| वृत्तपत्रातील निविदा प्रसिध्दी दि. | :- | दि. ०७/०३/२०२४ |
| ई-टेण्डरींगद्वारे निविदा प्रिपरेशनची तारीख | :- | दि. ०७/०३/२०२४ दु. ३.०० पासुन ते दि. २१/०३/२०२४ दु. ३.०१ पर्यत |
| ई-टेण्डरींगद्वारे निविदा सुचना स्विकारण्याची तारीख | :- | दि. २१/०३/२०२४ |
| विहीत मुदतीत ऑनलाईन प्रिक्रियेद्वारे प्राप्त निविदा | :- | ०८ |
| प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी | :- | कार्यकारी अभियंता |
| द्वितीय लखोटा उघडल्याची दिनांक | :- | दि. २२/०५/२०२५ |

तसेच जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांचे कडील जा.क्र.जिनिस./O/२०२३ /Dec/ CombineAA/०२८१८ दि.२९/१२/२०२३ (पृष्ठ क्र.४३) रोजीच्या पत्रानुसार सदर कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. खालील दिलेल्या तक्यामध्ये नमुद केलेल्या माहिती प्रमाणे.

| अ. क्र. | कामाचा संकेताक | तालुका | गाव/ शहर | कामाचे नाव | तांत्रिक मान्यता | | प्रशासकीय मान्यता रक्कम | वितरीत निधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | दिनांक | रक्कम | | |
| १. | GP/२३२४/१०३६ | वसई | वसई-विरार | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती "एफ" वॉर्ड क्र.४२ अंतर्गत भूमी एक्वा ते झाटे कंपाऊंड गटार व रस्ता तयार करणे. | ०८/११/२०२३ | २१३६१.९७० | १००००.०० | ६६६६.०० |

**प्राप्त निविदा समिती पुढे उघडली असुन त्यांचे दर पुढीलप्रमाणे :-**

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर |
|---|---|---|
| १. | मे. महेश विजय सातपुते | (-) ०.१०% कमी दराने |
| २. | मे. ए. जी पाटील | (+) ६.००% जास्त दराने |
| ३. | मे. मेहुल अरविंद वर्तक | (+) ६.००% जास्त दराने |

उपरोक्त निविदेची तुलना केली असता **मे. महेश विजय सातपुते** यांची **०.१०% कमी** दराची निविदा ही प्राप्त निविदा मधील सर्वात कमी दराची आहे. सदर निविदाधारक **मे. महेश विजय सातपुते** यांचे दर तुलनात्मक दृष्टया इतर निविदाधारकांपेक्षा कमी असुन योग्य व वाजवी आहे.

दि. ०३/०६/२०२५ रोजी अन्वये मा. निविदा समितीने **मे. महेश विजय सातपुते** यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा **०.१०% कमी** दराच्या निविदेच्या मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

नागरी दलित्तेतर वस्ती योजने अंतर्गत सन २०२३-२४ करीता सदर कामांना महाराष्ट्र अधिनियमाचे कलम ६७ (३)(क) अन्वये मा. आयुक्तांचे अधिकार व कर्तव्यनुसार राज्य दरसुची प्रमाणे तयार कलेल्या खालील कामांच्या अंदाजपत्रकांपा व निधी व्यतिरिक्त होणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता प्रशासकिय ठराव क्र.३०५३ (पृष्ठ क्र.३३) दि.१३/०२/२०२४ रोजी मान्याता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | मंजुर निधी | मनपा फंडातुन होणारा खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती "एफ" वॉर्ड | रु.२,१३,६१,९७०/- | रु.१,००,००,०००/- | रु.१,१३,६१,९७०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | क्र.४२ अंतर्गत भूमी एक्वा ते झाटे कंपाऊंड गटार व रस्ता तयार करणे. | | | |

तरी **मे. महेश विजय सातपुते** यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा **०.१०% कमी** दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) अन्वये मा. महासभेपुढे संविदा करणेकरीता मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव/निर्णय** :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. उपरोक्त निविदांची तुलना करता **मे. महेश विजय सातपुते** यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा **०.१०% कमी** दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. कमी दराच्या निविदा मंजुरीबाबत मा. आयुक्त सो. ह्यांनी शिफारस करणेत आलेली आहे. करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(**क**) नुसार **मे. महेश विजय सातपुते** यांच्या **०.१०% कमी** दराच्या निविदेस मंजुरी देणेत येत असुन सदर कामाची संविदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सुचकाचे नांव : श्री. पंकज पाटील

व स्वाक्षरी ---------------------------------

अनुमोदकाचे नांव : श्री. प्रफुल्ल पाटील

व स्वाक्षरी ---------------------------------

अनुकुल संख्या ________ प्रतिकुल संख्या ________ तटस्थ संख्या ________

ठराव/सर्वानुमते/बहुताने/मंजुर/नामंजुर

पिठासीन अधिकारी
सर्व साधारण सभा
वसई-विरार शहर महानगरपालिका

* (आवश्यक नसेल ते खोडावे)

**वसई विरार शहर महानगरपालिका**
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी-०२५-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई- मेल-Vasaivirarcorporation@yahoo.com

---

**ठराव क्र.** २४

**विभाग : मालमत्ता व्यवस्थापन**
**दिनांक :** ०६/०४/२०२६

---

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नविन प्रशासकीय (परिवहन भवन) इमारतीमध्ये उपहारगृह (कॅन्टींन) सुरु करणेकामी अनुभवी संस्थाकडुन अभिव्यक्ती स्वारस्य (Expression Of Interest) (EOI) पात्र निविदा धारकाबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-**

| | |
|---|---|
| विभाग | मालमत्ता व्यवस्थापन विभाग, मुख्यालय |
| कामाचे नाव | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नविन प्रशासकीय (परिवहन भवन) इमारतीमध्ये उपहारगृह (कॅन्टींन) सुरु करणेकामी पात्र निविदा धारकाबरोबर संविदा करणेकामी. |
| लेखाशिर्ष | म्युनसिपल औद्योगिक वसाहत ब, हस्तांतरण फी |
| भाडे निश्चिती रक्कम | दि.१०/०३/२०२६ रोजीच्या मा.आयुक्त तथा अध्यक्ष, भाडे व सुरक्षा ठेव समितीच्या अधिनस्त बैठकीतील निर्णयान्वये प्रतिमहा भाडे दर १% प्रमाणे रक्कम रु. ६२,१६९/- निश्चित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याकामी निर्देश दिलेले आहे. |
| प्रशासकीय मान्यता आदेश/ठराव क्र. | मा. आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र. १५४८ दि.३१/१०/२०२५ |
| निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक | दि. ०३/१२/२०२५ |
| वृत्तपत्र निविदा प्रसिध्दी दिनांक | दि. ०३/१२/२०२५ |
| कालावधी | ३ वर्ष |
| वृत्तपत्रांची नांवे | १) लोकमत, २) द इंडियन एक्सप्रेस, ३) चौफेर संघर्ष, ४) नरविर चिमाजी |
| अनुभवी संस्थाकडुन अभिव्यक्ती स्वारस्य प्राप्त उमेदवार संख्या | ६ |
| प्राप्त इच्छुक संस्थांचे प्रस्ताव संबधित अधिकारी यांच्या नावे नमुद करावी | मा. अतिरिक्त आयुक्त (उ) |

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नविन प्रशासकीय (परिवहन भवन) इमारतीमध्ये उपहार गृह (Canteen) सुरु करणेकामी ६ इच्छुक उमेदवारांकडून प्रस्ताव सादरीकरण करणेकामी मा. अतिरिक्त आयुक्त (उ) यांच्या दालनात दि.१२/१२/२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत ६ इच्छुक उमेदवारांकडून प्रस्ताव सादरीकरण करण्यात आलेले असून सदर सादरी करणानुसार मुल्यमापन करण्यात येऊन त्यांचे गुणांकन करण्यात आलेले आहे ते पुढील प्रमाणे.

| अ क्र | निविदाकाराचे नाव | गुणांकन |
|---|---|---|
| १ | मॅगपाइ हॉस्पीटॅलीटी | ९३ |
| २ | रुमाव कॅटरर्स | ९२ |
| ३ | मॅगपाई हेल्थ फुड | ८५ |
| ४ | दिव्या कॅटरर्स | ८० |
| ५ | आकांक्षा शहरस्तर स्तंभ (CLF) | ७६ |
| ६ | गुरुदत्त कॅटरिंग | ५४ |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता मे. मॅगपाइ हॉस्पीटॅलीटी यांची सादरीकरणाच्या अनुषंगाने केलेल्या मुल्यमापनानुसार ९३ इतक्या जास्त गुणांकनाचा प्रस्ताव वाजवी असल्याचे वाटते.

| अ क्र | निविदाकाराचे नाव | गुणांकन |
|---|---|---|
| १ | मॅगपाइ हॉस्पीटॅलीटी | ९३ |

मे. मॅगपाइ हॉस्पीटॅलीटी यांचे मुल्यमापनानुसार केलेल्या गुणांकनाच्या अन्वये पात्र प्रस्तावास पुढील ३ वर्षाकरीता भाडे व सुरक्षा ठेव समितीने निश्चित केलेल्या प्रतिमहा भाडेदर रक्कम रु. ६२,१६९/- नुसार भाडेतत्वावर देणेकामी शासनाच्या प्रचलित निर्णय व धोरणानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ अन्वये मान्यतेकामी मे. मॅगपाइ हॉस्पीटॅलीटी यांच्या समवेत संविदा करणेकामी मा. स्थायी समिती मध्ये मान्यतेकामी पुढील निर्णयास्तव सविनय सादर.

**प्रस्तावाचा निर्णय** :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नविन प्रशासकीय (परिवहन भवन) इमारतीमध्ये उपहारगृह (कॅन्टींन) सुरु करणेकामी अनुभवी संस्थाकडुन अभिव्यक्ती स्वारस्य (Expression Of Interest) (EOI) द्वारे प्राप्त मे.मॅगपाइ हॉस्पीटॅलीटी यांचे गुणांकनाच्या आधारे पात्र निविदा धारकाबरोबर पुढील ९ वर्षाकरीता भाडे व सुरक्षा ठेव समितीच्या बैठकीतील निर्णयान्वये रक्कम रु. ६२,१६९/- प्रतिमहा दराने भाडेतत्वावर मे. मॅगपाइ हॉस्पीटॅलीटी यांना देणेकामी व त्यांच्या समवेत संविदा करणेकामी पुढील कार्यवाही करण्यास मा. स्थायी समिती मध्ये मान्यता देण्यात येत आहे.

सुचकाचे नांव :- श्री. नरेंद्र पाटील

व स्वाक्षरी :-

अनुमोदकाचे नांव :- श्री. प्रफुल्ल पाटील

व स्वाक्षरी :-

अनुकुल संख्या________ प्रतिकुल संख्या________ तठस्थ संख्या ________

ठराव / सर्वानुमते / बहुमताने / मंजूर / नामंजूर

(प्रविण शेट्टी)
पिठासीन अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

सार्वजनिक वाचनालय विभाग

मुख्यालय,विरार (प.)

स्थायी समिति सभा ठराव

**ठराव क्रमांक** २५ **दि.** ०६/०४/२०२६

**प्रस्तावाचा विषय :- २३ वा साहित्य जल्लोष या साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** १) साहित्य जल्लोष प्रतिष्ठान या संस्थेचे पत्र दि.१६/०३/२०२६.

२) "चौरंग" या संस्थेचे पत्र दि.०६/०४/२०२६.

३) प्रशासकीय विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई- मुख्यालय ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई.माहिती पुस्तिका (नागरिकांची सनद).

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका व साहित्य जल्लोष प्रतिष्ठान या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने साहित्य जल्लोष हा कार्यक्रम दरवर्षी १९९६ पासून राबविण्यात येतो. दरवर्षी अंदाजित ८०० ते १००० नागरिक कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी येतात. सदर कार्यक्रमाच्या माध्यमातून वसईची साहित्यिक व सांस्कृतिक परंपरा जोपासण्याचा प्रयत्न केला जातो. वसईतील साहित्यिक, कलाप्रेमी, नाटयप्रेमी, कलाकार, नागरिक व विदयार्थी हयांची साहित्यिक व सांस्कृतिक भूक शमविणे, त्यांना प्रोत्साहन देणे, त्यांचे मनोरंजन करणे व त्यांच्या कलागुणांना वाव देणे हा यामागचा हेतू आहे.

दरवर्षी प्रमाणे या वर्षी हि २३ वा साहित्य जल्लोष कार्यक्रम साजरा करण्यासाठी **संदर्भ क्र.०१ अन्वये** साहित्य जल्लोष प्रतिष्ठान या संस्थेचे पत्र प्राप्त झालेले आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध शैक्षणिक, सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने तसेच तत्कालीन नगरपरिषदा व विद्यमान वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या भरीव पाठींबा व सहकार्याने गेली २६ वर्षात २२ साहित्य जल्लोष कार्यक्रम यशस्वीपणे पार पडले आहेत.

यावर्षीचा २३ वा साहित्य जल्लोष कार्यक्रम साहित्य जल्लोष प्रतिष्ठान, वसई विरार शहर महानगरपालिका (ग्रंथालय विभाग), ज्ञानदीप मंडळाचे संत जोसेफ महाविद्यालय, सत्पाळा, विरार यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी करण्याचे साहित्य जल्लोष प्रतिष्ठानच्या सभेत ठरविण्यात आले आहे. तसेच, तरी दरवर्षी होणाऱ्या साहित्य व सांस्कृतिक चळवळ उपक्रम संयुक्त विद्यमाने करण्यास मान्यता द्यावी व सहभागी होऊन सर्वतोपरि सहकार्य करावे अशी विनंती पत्राद्वारे केलेली आहे.

सदर पत्रासोबत संपूर्ण कार्यक्रमासाठी होणारा खर्चाचा व साहित्याचा तपशील जोडलेला आहे.

**तक्ता क्र.०१**

**साहित्य जल्लोष कार्यक्रमाच्या खर्चाचा तपशिल**

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | किंमत |
|---|---|---|
| १. | पाहुण्यांचे , परिक्षक मानधन व निवास व्यवस्था | २,५०,०००/- |
| २. | सांस्कृतिक कार्यक्रम "संस्कृती महाराष्ट्राची" | ५,३१,०००/- |
| ३. | रांगोळी, लेझीम, तुतारी , ढोल व सजावट | ७५, ०००/- |
| ४. | मंडप डेकोरेशन , साऊंड सिस्टिम व लाईटींग | २,००,०००/- |
| ५. | चहा, कॉफी, नाश्ता, भोजन व पाणी व्यवस्था. | ३,००,०००/- |
| ६. | बॅनर / प्रसिध्दी | १,५०,०००/- |
| ७. | फोटोग्राफी, व्हिडीओ शुटींग थेट प्रक्षेपण | १,००,०००/- |
| ८. | निमंत्रण पत्रिका , सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र | १,००,०००/- |
| ९. | पुस्तके | २५,०००/- |
| १०. | इतर खर्च | ७५,०००/- |
| | एकूण अंदाजित खर्च | १८,०६,०००/- (+GST सह) |

वरील खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे साहित्य जल्लोष प्रतिष्ठान संस्थेने सादर केलेला आहे.

**तक्ता क्र.०२**

संपुर्ण कार्यक्रमासाठी येणारे प्रमुख पाहुणे व परिक्षक यांना वितरित करावयाचा मानधनाच्या व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या मानधनाच्या खर्चाचा तपशील

| अनु.क्र. | सत्र | प्रमुख पाहूण्याचे नाव | मानधनाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | उद्घाटन | १)ॲड.डॉ.दिलीप पांढर पट्टे | रु.१५,०००/- |
| | | २)श्री.अरूण नलावडे | रु.१५,०००/- |
| | | ३) मा.ॲड.राजेंद्र पै | रु.१०,०००/- |
| २ | मुलाखत | १) श्री. मधुकर भावे | रु.१५,०००/- |
| | | २) श्री. कमलेश सुतार | रु.१५,०००/- |
| | | ३) श्री. कुणाल रेगे | रु.१०,०००/- |
| ३ | मुख्य कवी संमेलन प्रमुख पाहुणे | १) श्री. अशोक नायगावकर | रु.१५,०००/- |
| | | २) श्री.अरुण म्हात्रे | रु.१०,०००/- |
| ४ | सुत्रसंचालन | १)श्रीमती सुरेखा कुरकुरे | रु.५००/- |
| | | २)श्रीमती शिल्पा परुळेकर पै. | रु.५००/- |
| ५ | निमंत्रित | १) श्रीमती.संगीता पाटील | रु.५००/- |
| | | २)डॉ.रिबेका दोडती | रु.५००/- |
| | | ३) श्रीमती. प्रज्ञा जोशी | रु.५००/- |
| | | ४)श्रीमती. स्वाती भोईर | रु.५००/- |
| | | ५)श्रीमती. संगीता अरबुने | रु.५००/- |
| | | ६) श्रीमती. विशाखा गाळवणकर | रु.५००/- |
| | | ७) श्रीमती. सुषमा राऊत | रु.५००/- |
| | | ८) श्री. शुभम पाटील | रु.५००/- |
| | | ९) श्रीमती पल्लवी बनसोडे | रु.५००/- |
| | | १०)श्रीमती. ज्योती राव | रु.५००/- |
| | | ११)श्रीमती मंजुषा गवई | रु.५००/- |
| | | १२)श्रीमती सीमा पाटील | रु.५००/- |
| | | १३) श्री.अमोल नाईक | रु.५००/- |
| | | १४)श्रीमती स्नेहा पंडीत | रु.५००/- |
| | | १५)डॉ सुरेखा धनावडे | रु.५००/- |
| | | १६)श्री प्रकाश पाटील | रु.५००/- |
| | | १७) श्री.सॅबी परेरा | रु.५००/- |
| | | १८)श्रीमती रेषा अकोटकर | रु.५०० |
| | | १९) श्री.पिराजी जाधव | रु.५००/- |
| | | २०) श्री.महादेव ईरकर | रु.५००/- |
| | | २१) श्री.सौरभ पाटील | रु.५००/- |
| | | २२) श्रीमती.अनघा खरात | रु.५००/- |
| | | २३) श्री.रोहन रत्ने | रु.५००/- |
| | | २४) श्री.समर सावंत | रु.५००/- |
| | | २५) श्रीमती.मुस्कान चुरीहार | रु.५००/- |
| | | २६) फ्रँक मिरांडा | रु.५००/- |
| | | २७) पंकज चव्हाण | रु.५००/- |
| | | २८) मेल्सीना तुस्कानो - परेरा | रु.५००/- |
| ६ | सांस्कृतिक कार्यक्रम "**अत्रे, अत्रे.सर्वत्रे**" | १) श्री. अशोक हांडे | रु.५,३१,०००/-(+१८% GST सह) |
| ७ | रांगोळी | १) श्री.गणेश सोलंकी | रु.५०००/- |
| ८ | तुतारी | २) श्री. प्रभाकर भोसले | रु.६०००/- |
| ९ | लेझीम/ढोलपथक | ३) श्री. दिवेश राऊत | रु.१५०००/- |
| १० | निवास व्यवस्था | | रु.१६०००/- |
| ११ | इतर मानधन | आवश्यकतेनुसार | रु.५०,०००/- |
| | | **एकुण खर्च** | **रु. ७,४३,०००/-** |

## तक्ता क्र.०३
## संपुर्ण कार्यक्रमासाठी लागणारे साहित्याचा तपशील

| अनु.क्र | साहित्याचे नाव | नग |
|---|---|---|
| १ | सकाळी- नाश्ता | ३०० नग |
| २ | सकाळी- चहा | ३०० नग |
| ३ | दुपारचे भोजन | ३०० नग |
| ४ | सायं. नाश्ता | ३०० नग |
| ५ | सायं. चहा | ३०० नग |
| ६ | रात्रीचे भोजन | ५० नग |
| ७ | तुळशीचे रोपे | २० नग |
| ८ | शाल | २० नग |
| ९ | सन्मानचिन्हे ९ इंच | ३० नग |
| १० | सन्मानचिन्हे १२ इंच | २० नग |
| ११ | ग्रंथ (पुस्तके) | ४० नग |

तसेच संपूर्ण कार्यक्रमाची व्यापक पूर्व प्रसिद्धी करण्यासाठी लाकडी फ्रेम सह. फ्लेक्स बॅनर्स छपाई,स्क्रिन प्रिंटिंगसह निमंत्रण पत्रिका छपाई, कार्यक्रमाच्या दिवशी पाहुण्याचे कलाकारांचे स्वागतासाठी पुष्प गुच्छ, शाल, श्रीफळ, व्हिडिओ शुटिंग, फोटोग्राफी, साऊंड सीस्टीम, झालरसह लाकडी टेबल, खुर्च्या, गाद्यांची बैठक व्यवस्था, कार्यक्रमासाठी येणारी नागरीक, पाहूणे, कलाकार हयांना अल्पोपहार, चहा, कॉफी, सील बंद पाणी, भोजन व्यवस्था ( शाकाहारी) इत्यादी साहित्यांची व्यवस्था करावी लागणार आहे. सदरचे संपूर्ण साहित्याचा पुरवठा महानगरपालिकेच्या भांडार व क्रीडा विभागामार्फत उपलब्ध करता येईल. याकामी अंदाजित रक्कम रू.९,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**संदर्भ क्र.०२** अन्वये साहित्य जल्लोष प्रतिष्ठान या संस्थेच्या पत्रा सोबत “चौरंग” या संस्थेचे पत्र जोडलेले आहे. आमच्या संस्थेच्या वतीने "अत्रे, अत्रे,सर्वत्रे " हा सांस्कृतिक कार्यक्रम रविवार, दि १२ एप्रिल २०२६ रोजी सायं.५.३० ते रात्री ८.३० यावेळेध्ये सादर करण्याचा आमचा मानस आहे, असे नमुद केलेले आहे.

सदर कार्यकामाची रुपरेषा पुढील प्रमाणे -

- संकल्पना/ लेखन/ दिग्दर्शन : अशोक हांडे
- संगीत संयोजन : महेश खानोलकर, ज्ञानेश देव
- गायक : निलाक्षी पेंढारकर, मैथिली जोशी, स्मिता जोशी, सचिन मुळ्ये, प्रमोद सोहोनी, सुरेश बापट
- वादक : महेश खानोलकर, ज्ञानेश देव, नीला सोहोनी, करूण वावरे, अमित गोठीवरेकर, अविनाश मयेकर, नारायण साळंके, भावेश पाटील, विवेक सुर्यवंशी, अभिमान आपटे, गोविंद हडकर, अजिंक्य सावंत
- ध्वनि नियोजन : दिलीप बोनाटे
- प्रकाश योजना : सनिल जाधव व्हिडिओ : सुजय हांडे
- सर्व गायक निवेदिका वादक मंडळी ध्वनिक्षेपक संच प्रवास खर्च

आमच्या संस्थेचे मानधन आणि तेथील आयोजनाचा खर्च मिळून कार्यक्रमाचे एकूण मानधन रु ५,३१,०००/- + GST सह रुपये होईल असे पत्रामध्ये नमूद केले आहे.

साहित्य जल्लोष प्रतिष्ठान व “चौरंग” या दोन संस्थांनी विनंती केल्यानुसार "अत्रे, अत्रे,सर्वत्रे " हा कार्यक्रम आयोजित करावयाचा असल्यास "अत्रे, अत्रे,सर्वत्रे " हा कार्यक्रम गायक, वादक, निवेदक इत्यादी चमुमार्फत सादर होणार आहे. त्यामुळे सदर कार्यक्रम सादरीकरण करण्याकरीता दरपत्रक मागविणे संयुक्तिक आहे असे मत आहे.

परंतू कार्यक्रमाचे पूर्व तयारी करीता कमी कालावधी असल्यामुळे दरपत्रक प्रक्रिया पुर्ण करणे शक्य होणार नाही. तथापि **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ड ५(२)(२) अन्वये स्थायी समितीला, तिच्या कार्यवृत्तात कारणे नमूद करुन, आयुक्तास, यात तरतुद केल्याप्रमाणे निविदा न मागविता किंवा मागवल्यानंतर त्याच्याकडे ज्या कोणत्याही निविदा येतील त्या न स्विकारता, संविदा करण्यास प्राधिकृत करता येईल** असे नमूद आहे. त्यानुसार विना निविदा सदरचा कार्यक्रम सादर करण्यासाठी “चौरंग” (श्री.अशोक हांडे) या संस्थेस प्राधान्य देता येईल.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती "सी" चंदनसार येथील सार्वजनिक वाचनालय विरार हे शासनमान्य इतर “ब” वर्गाचे वाचनालय आहे. सदर वाचनालयास शासनाकडून इतर “ब” वर्गासाठी निर्धारित करण्यात आलेले अनुदान प्राप्त होते. संदर्भ क्र.०३ नुसार अनुदान प्राप्तीसाठी शासनाने वर्गनिहाय नेमुन दिलेले निकष सार्वजनिक वाचनालयांनी पुर्ण करणे प्रत्येक वाचनालयास बंधनकारक आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

### ग्रंथालयाचे वर्गनिहाय निकष

| वर्ग | ग्रंथ संख्या | सदस्य | वृत्तपत्रे | बालविभाग | महिलाविभाग | सांस्कृतिक कार्यक्रम |
|---|---|---|---|---|---|---|
| इतर “ब” | ५,००१ | ३०१ | ०६ | आवश्यक | आवश्यक | किमान ०४ |

उक्त नमूदप्रमाणे संपूर्ण कार्यक्रमाचे होणारे सर्व प्रकारचे मानधन रक्कम रुपये ७,४३,०००/- व कार्यक्रमासाठी लागणारे सर्व प्रकारचे साहित्य यावर होणारा अंदाजित खर्च रक्कम रुपये ९,००,०००/- असे एकत्रित मिळून संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी अंदाजित रक्कम रुपये १६,४३,०००/- लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे पोटकलम ६६ नुसार महानगरपालिकेस स्वेच्छानिर्णयानुसार करता येईल अशा बाबीमध्ये क्रमांक.९ वर लोकांसाठी संगीताची तरतूद करणे असे नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सन २०२६ -२७ या वर्षातील अर्थसंकल्पात साहित्यिक, शैक्षणिक व इतर ग्रंथालयीन अनुषंगीक कार्यक्रम ( ग्रंथालय विभाग ) या लेखाशिर्षांतर्गत रक्कम रु. ३० लक्ष या तरतूद करण्यात आली आहे. त्या अंतर्गत सदर कार्यक्रम आयोजित करता येईल.

सबब साहित्य जल्लोष प्रतिष्ठान, वसई विरार शहर महानगरपालिका (ग्रंथालय विभाग), ज्ञानदीप मंडळाचे संत जोसेफ महाविद्यालय, सत्पाळा यांच्या संयुक्त विद्यमाने २३ वा साहित्य जल्लोष कार्यक्रम आयोजित करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समितीपुढे ठेवण्याच्या मान्यतेस सादर. तसेच सदर कार्यक्रम खर्चाची निश्चिती दरपत्रक मागवून अथवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ड ५(२) (२) अन्वये वर प्रस्तावित केल्यानुसार करावी याबाबत निर्णय होऊन साहित्य जल्लोष कार्यक्रमासाठी येणा-या खर्चास वित्तीय मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती पुढे ठेवण्याच्या मान्यतेस सादर.

<u>**प्रस्तावाचा निर्णय**</u> :- वसई विरार शहर महानगरपालिका (ग्रंथालय विभाग), साहित्य जल्लोष प्रतिष्ठान व ज्ञानदिप मंडळाचे संत जोसेफ महाविद्यालय, सत्पाळा,विरार (प.) या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने २३ वा साहित्य जल्लोष हा कार्यक्रम रविवार, दि १२ एप्रिल २०२६ रोजी संत जोसेफ महाविद्यालय, सत्पाळा,विरार (प.) या ठिकाणी आयोजित करण्यात यावा. २३ वा साहित्य जल्लोष या कार्यक्रमासाठी येणारे प्रमुख पाहुणे , परिक्षक , मुख्य कवी संमेलन प्रमुख पाहुणे , सुत्रसंचालन, निमंत्रित स्थानिक कवी , रांगोळी, तुतारी, लेझिम पथक , ढोल पथक यांना वितरित करावयाचे मानधन , इतर मानधन तसेच "अत्रे अत्रे सर्वत्रे" या सांस्कृतिक कार्यक्रमाचे होणारे मानधन असे एकत्रित मिळून रक्कम रू.७,४३,०००/- इतका मानधनाचा खर्च महानगरपालिकेच्या वतीने करण्यात यावा. २३ वा साहित्य जल्लोष या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून "अत्रे अत्रे सर्वत्रे" सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्याची जबाबदारी श्री. अशोक हांडे यांच्या "चौरंग" या संस्थेस दयावी.

सदरचा कार्यक्रमाचे नियोजन करणेसाठी कमी कालावधी असल्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यासाठी "चौरंग" या संस्थेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" प्रकरण ५.२.२. या कलमान्वये विना निविदा/ दरपत्रक संधी उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच नमूद कार्यक्रमासाठी श्री.अशोक हांडे यांच्या "चौरंग" या संस्थेसोबत सदर कामाची संविदा करण्यात यावी त्यासाठी प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

तसेच सदर कार्यक्रमाचे होणारे मानधन रक्कम रु.५,३१,०००/-(१८% GST सह) कार्यक्रम संपुष्टात आल्यानंतर **.अशोक हांडे यांच्या "चौरंग"** या संस्थेने लेखी स्वरूपात मागणी केल्यानंतर आर.टी.जी.एस व्दारे अदा करण्यात यावे.

उक्त नमूद प्रमाणे कार्यक्रमासाठी येणारे प्रमुख पाहुणे व परिक्षक यांना वितरित करावयाचे मानधन व निवास व्यवस्था यावरील खर्च रु.२,१२,०००/- हे कार्यक्रमाच्या दिवशी धनादेशाव्दारे अदा करण्यात यावे.अदा केलेल्या मानधनाची पोच पावती घेण्याची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

संपूर्ण कार्यक्रमाची व्यापक पूर्व प्रसिद्धी करण्यासाठी लाकडी फ्रेम सह. फ्लेक्स बॅनर्स छपाई,स्क्रिन प्रिंटिंगसह निमंत्रण पत्रिका छपाई, कार्यक्रमाच्या दिवशी पाहुण्याचे कलाकारांचे स्वागतासाठी पुष्प गुच्छ, शाल, श्रीफळ, व्हिडिओ शुटिंग, फोटोग्राफी, साऊंड सीस्टीम, झालरसह लाकडी टेबल, खुर्च्या, गाद्यांची बैठक व्यवस्था, कार्यक्रमासाठी येणारी नागरीक, पाहूणे, कलाकार ह्यांना अल्पोपहार, चहा, कॉफी, सील बंद पाणी, भोजन व्यवस्था ( शाकाहारी) इत्यादी साहित्यांची व्यवस्था करावी लागणार आहे. सदरचे संपूर्ण साहित्याचा पुरवठा महानगरपालिकेच्या भांडार व क्रीडा विभागामार्फत उपलब्ध करण्यात यावे. याकामी अंदाजित रक्कम रू.९,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सबब संपूर्ण साहित्य जल्लोष कार्यक्रमासाठी येणारे प्रमुख पाहुणे व परिक्षक यांच्या मानधनावर होणारा खर्च रक्कम रुपये २,१२,०००/-, संपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी होणारा खर्च रक्कम रु. ५,३१,०००/- तसेच कार्यक्रमासाठी लागणारे उक्त नमूद साहित्यासाठी होणारा अंदाजित खर्च रक्कम रू.९,००,०००/- असे एकत्रित मिळून संपूर्ण कार्यक्रमासाठी अंदाजित रक्कम रुपये १६,४३,०००/- (अक्षरी रक्कम रू. सोळा लक्ष त्रेचाळीस हजार मात्र) इतक्या खर्चास मा. स्थायी समिती सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.

सुचकाचे नाव व स्वाक्षरी - श्री. नरेंद्र पाटील

अनुमोदकाचे नाव व स्वाक्षरी - श्री. पँकज पाटील

अनुकूल संख्या -------------------- प्रतिकुल संख्या---------------------- तटस्थ संख्या--------------

ठराव /सर्वानुमते /बहुमताने /मंजूर /नामंजूर

(प्रविण शेट्टी)
पिठासीन अधिकारी
स्थायी समिती
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.)

**मा.स्थायी समिती सभा सूचना क्र.०६**

**दि. ०९/०४/२०२६**

प्रति,

सन्मा. श्री / श्रीमती ..........................................

स्थायी समिती सदस्य / सदस्या,

वसई-विरार शहर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेची मा.विशेष स्थायी समिती सभा सोमवार, दि.१३/०४/२०२६ रोजी सायं.०४:३० वाजता **'मा.स्थायी समिती सभागृह'**, ४ था मजला, वसई-विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, यशवंत नगर, विरार (प.) येथे खालील विषयावर निर्णय घेणेसाठी आयोजित करण्यांत आली आहे.

तरी सदर सभेस कृपया हजर रहावे हि विनंती.

**मा.स्थायी समिती सभा विषय पत्रिका**

१. मागील दि.०६/०४/२०२६ रोजीच्या सभेचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.
२. वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील विविध रस्ते कॉक्रीटीकरण, खडीकरण व डांबरीकरण करणेकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-१ निविदा दर मागविणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.
३. वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई गाव येथील कोळीवाडा येथे मार्केट इमारत बांधणेसाठी संविदा करणेसाठी मान्यता मिळणेबाबत.
४. वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील पेल्हार येथील वनोठापाडा मुख्य रस्ता शिवाजी नगर ते शिवमंदीर पर्यंत रस्ता तयार करणेकरिता संविदा करणेसाठी मान्यता मिळणेबाबत.
५. विरार (पु.) येथील गणेश नगर येथे कमल अपार्टमेंट ते एकता मित्र मंडळ पर्यंत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणेकरिता संविदा करणेसाठी मान्यता मिळणेबाबत.
६. विरार (पु.) येथील गणेश नगर येथे गुरु सावली ते भोईरपाडा चौक पर्यंत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणेकरिता संविदा करणेसाठी मान्यता मिळणेबाबत.
७. वसई-विरार शहर महानगरपालिका बोळींज कार्यक्षेत्रातील क्रिडा संकुल म्हाडा मैदान विरार (प.) येथील मिनी सरस विक्री व प्रदर्शन २०२५-२६ ठिकाणी मुख्य वीज पुरवठा करणेकरिता केबल, फिडर पिलर व त्याअनुषंगिक इतर विद्युतीय कामे करणेबाबत.
८. स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत विविध अभियानांतर्गत नागरीकांचा सहभाग व अभिप्राय (Citizen Feedback) नोंदविणेकामी अभिकर्त्याची नियुक्ती करणेस होणाऱ्या खर्चास मा.स्थायी समिती सभेपुढे आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

(मा.सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,

(विश्वनाथ तळेकर)

महानगरपालिका सचिव

वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका
# मुख्य कार्यालय विरार (प.)
# मा.स्थायी समिती सभा

②

**स्थायी समिती सभा ठराव क्र.** २७ **सभा सुचना क्र.** ६ **सभा दिनांक.** २३/०४/२०२६

---

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील विविध रस्ते कॉक्रीटीकरण, खडीकरण व डांबरीकरण करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे बी-१ निविदा दर मागविणे कामी मान्यता देणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ए ते आय अंतर्गत विविध डांबरीकरण केलेले रस्ते आहेत. वसई विरार भुप्रदेश हा अति पर्जन्यशील क्षेत्रामध्ये येत असून दरवर्षी पावसाळ्या दरम्यान सुमारे ३००० मी.मी. ते ३५०० मी.मी. इतकी विक्रमी पावसाची नोंद होते. त्यामुळे वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात अतिवृष्टी निर्माण होते.

तसेच पावसाळ्यामध्ये अतिवृष्टीच्या वेळी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचते व रस्त्यालगत गटार नसल्याने रस्त्यावरील पाण्याचा निचरा योग्य त्या वेळेत होत नाही. पाण्याचा निचरा न झाल्याने नागरीकांना वाहतुकीच्या वेळेत विविध अडचणींना सामोरे जावे लागते. त्याचप्रमाणे सध्यस्थितीमध्ये रस्त्याची सुमारे रुंदी २० ते ३० मी. असल्याने रस्त्यावरुन जाणारी वाहने अतिवेगाने जातात व रस्त्यास दुभाजक नसल्याने बहुतांश वाहने गती वाढणेकरीता आपल्या लेन सोडुन दुसऱ्या लेनमध्ये जातात निदर्शनास येते व ह्यामुळे बऱ्याचदा अपघात झाल्याचे देखील आढळुन आलेले आहे. रस्त्याच्या बाजुस असलेल्या दुकानदारांकडुन रस्त्याकरीता आरक्षित असलेल्या जागेमध्ये अतिक्रमण होत असल्याने देखिल निदर्शनास येत आहे.

त्यामुळे खालील नमुद कामासाठी बी-१ निविदा दर मागविणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | वसई (प) मधील गिरीज येथील नवापाडा येथे स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण करणे | रु.१०,७७,९५५/- |
| २ | वसई (पू) मध्ये तांबडमाळ येथील गुरुनाथ बरफ ते संतोष नाना घरापर्यंत सी सी पाथवे बांधणे, | रु.८,२१,१३०/- |

| | | |
|---|---|---|
| ३ | वसई (पू) मध्ये कामण खिंडीपाडा स्मशानभूमी कडे जाणारा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे, कच्या राजा आहे. | रु.२१,७६,२१२/- |
| ४ | वसई (पू) मध्ये कामण सागपाडा येथील मुंशी मांझी ते परशुराम घाटाळ पर्यंत सी.सी. पाथवे बांधणे. | रु.१०,२३,३२६/- |
| ५ | वसई (पू) मध्ये कामण तुंबडआळी येथील भवनाच तुंबडा ते बाबु गोवारी यांचे घरापर्यंत सी.सी. पाथवे बांधणे. | रु.८,१६,९५६/- |
| ६ | वसई (पू) मधील बापाणे येथील श्री. विश्वनाथ धाम ते बापाणे मुख्य रस्ता सी. सी पाथवे बांधणे. | रु.१२,९६,९३४/- |
| ७ | वसई (पू) मधील बापाणे रायातवाडी येथील विमल रायात यांचे घर ते दुर्गाई चाळ पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.११,९६,२३२/- |
| ८ | वसई (पू) मधील कामण सागपाडा येथील गणेश बाळाराम बंधरे ह्यांचे घर ते अंगणवाडी पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण | रु.१६,८५,०३८/- |
| | **एकुण** | **रु.१,००,९३,७८३/-** |

वरील नमूद कामाचा खर्च **"रस्ता बांधकाम २०% मा.का. यो"** या लेखाशिर्ष अंतर्गत भागविण्यात येणार आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ए ते आय अंतर्गत विविध रस्ते कॉक्रीटीकरण, खडीकरण व डांबरीकरण करणे कामी एकूण **रक्कम रुपये १,००,९३,७८३/-** इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. वरील नमुद कामांकरीता होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी घेणे आवश्यक आहे

तरी वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ए ते आय अंतर्गत विविध रस्ते कॉक्रीटीकरण, खडीकरण व डांबरीकरण करणे कामी होणाऱ्या **रक्कम रुपये १,००,९३,७८३/-** इतक्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधि. १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याचे अधिकार मा. स्थायी समिती सभेला आहेत. सदरील प्रस्ताव निधी उपलब्धतेच्या अधीन राहून मंजूरीस्तव सविनय सादर.

तरी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेपुढे ठेवणेस शिफारस असे.

**ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील खालील नमुद तक्त्यानुसार विविध रस्ते कॉक्रीटीकरण, खडीकरण व डांबरीकरण करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे बी-1 निविदा दर मागविणे कामी मा.स्थायी समिती सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | वसई (प) मधील गिरीज येथील नवापाडा येथे स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण करणे | रु.१०,७७,९५५/- |
| २ | वसई (पू) मध्ये तांबडमाळ येथील गुरुनाथ बरफ ते संतोष नाना घरापर्यंत सी सी पाथवे बांधणे, | रु.८,२१,१३०/- |
| ३ | वसई (पू) मध्ये कामण खिंडीपाडा स्मशानभूमी कडे जाणारा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे, कच्या राजा आहे. | रु.२१,७६,२१२/- |
| ४ | वसई (पू) मध्ये कामण सागपाडा येथील मुंशी मांझी ते परशुराम घाटाळ पर्यंत सी.सी. पाथवे बांधणे. | रु.१०,२३,३२६/- |

| | | |
|---|---|---|
| ५ | वसई (पू) मध्ये कामण तुंबडआळी येथील भवनाच तुंबडा ते बाबु गोवारी यांचे घरापर्यंत सी.सी. पाथवे बांधणे. | रु.८,१६,९५६/- |
| ६ | वसई (पू) मधील बापाणे येथील श्री. विश्वनाथ धाम ते बापाणे मुख्य रस्ता सी. सी पाथवे बांधणे. | रु.१२,९६,९३४/- |
| ७ | वसई (पू) मधील बापाणे रायातवाडी येथील विमल रायात यांचे घर ते दुर्गाई चाळ पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.११,९६,२३२/- |
| ८ | वसई (पू) मधील कामण सागपाडा येथील गणेश बाळाराम बंधरे ह्यांचे घर ते अंगणवाडी पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण | रु.१६,८५,०३८/- |

---

**सुचकाचे नाव :-** नरेंद्र पाटील

**व स्वाक्षरी :-** [signature]

**अनुमोदकाचे नाव :-** जितेंद्र पाटील

**व स्वाक्षरी :-** [signature]

**अनुकुल संख्या** -------------------------- **प्रतिकुल संख्या**-------------------------**तटस्थ संख्या**------------

**(ठराव/ सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर)**

[signature]

**सभापती तथा पिठासीन अधिकारी**
**स्थायी समिती**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

---

**(आवश्यक नसेल ते खोडावे)**

d/aniketj/paresh/tharav

③ I

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पश्चिम, जि. पालघर, पिन नं.४०१३०३**
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रस्ताव ठराव क्र. २८ विभाग : सार्व. बांधकाम
दिनांक : १३ /०४/२०२६

---

**प्रस्तावाचा विषय:** वसई-विरार शहर महानगरपालिका **वसई गांव येथील कोळीवाडा येथे मार्केट इमारत बांधणे** याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

| | |
|---|---|
| ई-निविदा क्र. | : २०२५_VVCMC_११३४८१०_४ |
| लेखाशिर्ष | : १) विकास निधी अंतर्गत आवश्यक तेथे शितगृहासह बहुउद्देशीय मार्केट बांधणे व इतर ठिकाणी छोटे मार्केट बांधणे. २) स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत कामे (आमदार निधी कामे) |
| योजनेचे नांव | : आमदार निधी |
| अंदाजपत्रकीय रक्कम | : रु. ३,४१,४१,५८६/- |
| तांत्रिक मान्यता रक्कम | : रु. ३,४१,४१,५८६/- |
| निविदा रक्कम | : रु. ३,४१,४१,५८६/- |
| प्रशासकीय मान्यता आदेश/ ठराव क्र. | : मा. आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र. १२८४ दि. ०८/१०/२०२४ |
| प्रशासकीय मान्यतेची रक्कम | : रु. ३,४१,४१,५८६/- |
| तांत्रिक मान्यता क्र. व दिनांक | : कार्यकारी अभियंता पृ.क्र. ०८ अ. क्र. ५५ दि. ०४/१०/२०२४ |
| ई-निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक | : वविशम/बांध/श.अ./१६२/२०२४-२५ दि. ०७/०१/२०२५ |
| वृत्तपत्र निविदा प्रसिध्दी दिनांक | : दि. ०७/०१/२०२५ |
| कालावधी | : २४ महीने |
| वृत्तपत्रांची नांवे | : १) दै. नवराष्ट्र २) दै. मुंबई चौफेर ३) दै. महासागर ४) दै. नवभारत ५) दै. हमारा महानगर ६) दै. फ्रि प्रेस जनरल ७) दै. मिड-डे |
| ई निविदा प्रसिध्दी | : दि. ०८/०१/२०२५ दु.३.०० पासुन ते दि. २२/०१/२०२५ दु.३.०१ पर्यत |
| ई निविदाद्वारे विहीत मुदतीत प्राप्त निविदा संख्या | : ०५ |
| प्रथम लिफाफा उघडल्याची दिनांक | : दि. २२/०१/२०२५ |
| द्वितीय लिफाफा उघडल्याची दिनांक | : दि. १३/११/२०२५ |
| प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी (ज्यांच्या डीएससी ने निविदा उघडल्या त्यांची नावे नमुद करावी | : प्र. शहर अभियंता |

**प्राप्त निविदा समितीपुढे उघडली असुन त्यांचे दर पुढीलप्रमाणे :-**

| अ. क्र. | निविदाकार | निविदा दर |
|---|---|---|
| १ | मे. हमिद जे. शेख | १२.७९% जास्त दराने |
| २ | मे. संजय कंस्ट्रक्शन | १५.००% जास्त दराने |
| ३ | मे. वैष्णवी कंस्ट्रक्शन | १५.००% जास्त दराने |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. हमिद जे. शेख** यांची **१२.७९% जास्त** दराची निविदा प्राप्त झालेली आहे. परंतु सदर दर महापालिकेस जास्त वाटत असल्याने दि. १४/११/२०२५ रोजी **मे. हमिद जे. शेख** हयांना वाटाघाटीचे पत्र देण्यात आले होते. व सदर पत्रानुसार दि. १८/११/२०२५ रोजी मा. कार्यकारी अभियंता यांच्या दालनात घेण्यात आलेल्या बैठकीच्या अनुषंगाने **मे. हमिद जे. शेख** हयांनी सदर काम **अंदाजपत्रकीय** दराने करणेस तयार असल्याचे दि. १८/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे :-

| अ. क्र. | ठेकेदाराचे नांव | निविदेसोबत दिलेले दर (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) | वाटाघाटी नंतर दिलेले दर (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) |
|---|---|---|---|
| १ | मे. हमिद जे. शेख | १२.७९% जास्त दराने | अंदाजपत्रकीय दराने |

उपरोक्त निविदाकार यांनी सादर केलेल्या दराचा विचार करता सर्वात कमी दरास **मे. हमिद जे. शेख** हे निविदाकार ठरत असुन त्यांनी (वाटाघाटीअंती) **अंदाजपत्रकीय** दर नमुद केलेले आहेत. तरी संबंधितास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये मा. स्थायी समिती सभेपुढे संविदा करणेकरीता मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव/निर्णय** :- वसई विरार शहर महानगरपालिका **वसई गांव येथील कोळीवाडा येथे मार्केट इमारत बांधणे** कामी प्राप्त निविदांपैकी **मे. हमिद जे. शेख** यांच्या निविदेतील (वाटाघाटीअंती) **अंदाजपत्रकीय** दराने निविदाही सकारात्मक दृष्ट्या कमी व योग्य आहे. या ठरावान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणेस तसेच त्याअनुषंगाने होणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सुचकाचे नांव : लॉरेल डायस
व स्वाक्षरी

अनुमोदकाचे नांव : चंद्रशेखर धुरी
व स्वाक्षरी

अनुकुल संख्या – प्रतिकुल संख्या – तटस्थ संख्या –

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजुर/~~ना~~मंजुर

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती
वसई-विरार शहर महानगरपालिका

* (आवश्यक नसेल ते खोडावे)

C:\Users\vvmc\Desktop\13APRIL THARAV\3 Tharav (N).docx

44

# वसई - विरार शहर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा

---

**सभा ठराव क्र .** २९

**विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक :** १२/०४ /२०२६

---

कामाचे नाव:- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील पेल्हार येथील वनोठापाडा मुख्य रस्ता शिवाजीनगर ते शिवमंदीर पर्यंत रस्ता तयार करणे. याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

लेखाशिर्ष:- रस्ता बांधकाम योजनेचे नाव :-
अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. १,९५,७९,४२३/-
तांत्रिक मान्यता रक्कम :- रु. १,९५,७९,४२३/-
निविदा रक्कम :- रु. १,९५,७९,४२३/-
प्रशासकीय मान्यता आदेश/ ठराव क्र.:- २०१८ दिनांक :- ०३/०२/२०२३
प्रशासकीय मान्यतेची रक्कम :- रु. १,९५,७९,४२३/-
सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता रक्कम :- रु. १,९५,७९,४२३/- (अंदाजपत्रकीय दराने)
तांत्रिक मान्यता क्र. दिनांक :- प्र.शहर अभियंता पृ.क्र.०९ अ.क्र. ५५ दि.२५/०१/२०२३
ई- टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/१३३५/२०२३, दि.०३/१०/२०२३
कार्यकारी अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका
वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक :- दि. ०४/१०/२०२३
ई-निविदा प्रसिध्दी दिनांक. :- दि. १८/१०/२०२३ पासुन ते दि. २५/१०/२०२३ वेळ दु. ३.०० पर्यत
ई निविदा व्दारे विहीत मुदतीत प्राप्त निविदा संख्या :- ०९
प्रथम लिफाफा उघडल्याची दिनांक :- दि. २७/१०/२०२३
व्दितीय लिफाफा उघडल्याची दिनांक :- दि. २३/०५/२०२५
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी (ज्यांच्या डीएससीने निविदा उघडल्यात्यांची नावे नमुद करावीत ) :-
प्र. शहरअभियंता

प्राप्त निविदा समितीपुढे उघडले असून त्यांचे दर पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र. | निविदाकार | निविदा दर |
|---|---|---|
| १. | मे. साई कंस्ट्रक्शन | (+) ४.००% जास्त दराने |
| २. | मे. शर्वरी कंस्ट्रक्शन | (+) ६.००% जास्त दराने |
| ३. | मे. मेघना एंटरप्रायजेस | (+) ७.००% जास्त दराने |
| ४. | मे. राज एंटरप्रायजेस | (+)९.५०% जास्त दराने |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. साई कंस्ट्रक्शन** यांची **अंदाजपत्रकीय दराची** निविदा प्राप्त झालेली आहे. परंतू (+) ४.००% जास्त दर महापालिकेस जास्त वाटत असल्याने दि. २८/०५/२०२५ रोजी **मे. साई कंस्ट्रक्शन** यांना वाटाघाटीचे पत्र देण्यात आले होते. सदर पत्रानुसार दि.११/०६/२०२५ रोजी मा. कार्यकारी अभियंता यांच्या दालनात घेण्यात आलेल्या

बैठकीच्या अनुषंगाने **मे. साई कंस्ट्रक्शन** ह्यांनी सदर काम अंदाजपत्रकीय दराने करणेस तयार असल्याचे दि. ११/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदेसोबत दिलेले दर (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) | वाटाघाटीनंतर दिलेला दर (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) |
|---|---|---|---|
| १. | मे. साई कंस्ट्रक्शन | (+) ४.००% जास्त दराने | अंदाजपत्रकीय दराने |

उपरोक्त निविदाकार यांनी सादर केलेल्या दराचा विचार करता सर्वात कमी दरास **मे. साई कंस्ट्रक्शन** निविदाकार ठरत असून त्यांनी (वाटाघाटीअंती) अंदाजपत्रकीय दर नमूद केलेले आहेत. तरी संबंधितास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे संविदा करणेकरीता मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव निर्णय** - वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील पेल्हार येथील वनोठापाडा मुख्य रस्ता शिवाजीनगर ते शिवमंदीर पर्यंत रस्ता तयार करणेकामी प्राप्त निविदांपैकी **मे. साई कंस्ट्रक्शन** यांच्या निविदेतील (वाटाघाटीअंती) अंदाजपत्रकीय दराने निविदा ही सकारात्मक दृष्ट्या कमी व योग्य आहे. या ठरावान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस तसेच त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत येत आहे.

---

सुचकाचे नाव :- पंकज पाटील

स्वाक्षरी :-

अनुमोदक :- महेश सरवणकर

स्वाक्षरी :-

अनुकुल संख्या----–-------प्रतिकुल संख्या-------–--------तटस्थ संख्या----–-----------

(ठराव/ सर्वानुमते/बहुमताने/मंजुर/नामंजुर)

सभापती तथा पिठासीनअधिकारी
स्थायी समिती
वसई-विरार शहर महानगरपालिका

* (आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई - विरार शहर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा

(5)

सभा ठराव क्र . ३०

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : १३ / ०४ /२०२६

कामाचे नाव:- विरार (पु.) येथील गणेश नगर येथे कमल अपार्टमेंट ते एकता मित्र मंडळ पर्यंत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे.

लेखाशिर्ष:- रस्ता बांधकाम योजनेचे नाव :-

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ३४,००,९५५ /-

तांत्रिक मान्यता रक्कम :- रु. ३४,००,९५५ /-

निविदा रक्कम :- रु. ३४,००,९५५ /-

प्रशासकीय मान्यता आदेश/ ठराव क्र.:- १३८७ दिनांक :- ११/१०/२०२४

प्रशासकीय मान्यतेची रक्कम :- रु. ३४,००,९५५ /-

सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता रक्कम :- रु.२६,८६,७५५/- (अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-)२६.००% कमी दराने)

तांत्रिक मान्यता क्र. दिनांक :- प्र.शहर अभियंता पृ.क्र.१३/७८ सन २४-२५ दि.११/१०/२०२४

ई- टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/७१०/२०२५, दि.११/१०/२०२४
कार्यकारी अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक :- दि. ११/१०/२०२४

वृत्तपत्रांची नावे :-१. दै. प्रहार २. दै.नरवीर चिमाजी ३. दै.फ्रि प्रेस जर्नल

ई-निविदा प्रसिध्दीदिनांक.:-दि.११/१०/२०२४ पासुन ते दि. २५/१०/२०२४ वेळ दु. 3.00 पर्यत

ई निविदा व्दारे विहीत मुदतीत प्राप्त निविदा संख्या:- ०७

प्रथम लिफाफा उघडल्याची दिनांक :- २८/१०/२०२४

व्दितीय लिफाफा उघडल्याची दिनांक :- २६/११/२०२५

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी (ज्यांच्या डीएससीने निविदा उघडल्यात्यांची नावे नमुद करावीत ) :-
प्र. शहरअभियंता

प्राप्त दर

| अ.क्र. | निविदाकार | निविदा दर | निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॅार्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल | एल १,एल २, एल ३ इत्यादी नुसार क्रम निश्चीत करुन नोंदवावा | एल १ चा तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे.विशाल गुप्ता | २१.००% कमी दराने | पावती क्र.१९४१८४ दि.०९/१२/२०२५ | एल १ | |
| २ | मे. मेहुल वर्तक | १६.७७ % कमी दराने | | | |
| ३ | मे. माही कन्स्ट्रक्शन | १५.६२ % कमी दराने | | | |
| ४ | मे. ए जी पाटील | ९.९० % कमी दराने | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | मे. मनीष पाटील | ५.१० % जास्त दराने | | | |
| ६ | मे. रोशन जाधव | ४.५० % जास्त दराने | | | |
| ७ | मे. आकाश एटरप्राजयेस | अंदाजपत्रकीय दराने | | | |

उपरोक्त निविदांची तुलना करता **मे. विशाल गुप्ता** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा** (-)२१.००% **कमी दराने** हा तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहे.

सदर कामाचे हे अंदाजपत्राकीय दरापेक्षा (-)२१.००% **कमी दराने** असल्याने सिक्युरिटी म्हणून रु.६,१२,१७२/- इतक्या रक्कमेची परफॉर्मन्स सिक्युरीटी रक्कम पा.क्र. १९४१८४ दि. ०९/१२/२०२५ अन्वये भरणा केलेली आहे.

तरी **मे. विशाल गुप्ता** यांच्या **अंदाजपत्रकापेक्षा** (-)२१.००% **कमी दराच्या (रक्कम रु.** २६,८६,७५५/-) निविदेस सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (अ) नुसार देण्यास व त्यांच्याबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणे कामी मा.स्थायी समिती सभेपुढे मंजुरीस्तव सविनय सादर.

**प्रस्तावाचा निर्णय** - सदर बाबत सांगोपन चर्चा होऊन निविदांची तुलना करता **मे. विशाल गुप्ता हयांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा** (-)२१.०० % **(रक्कम रु.** २६,८६,७५५/-) दर कमी व योग्य आहे. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (अ) अन्वये हया कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त हयांनी मंजुरी दिली आहे. या कामी म.न.पा तर्फे कायदेशीर बाबींची पूर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

---

सुचकाचे नाव :- नरेंद्र पाटील

सही :- [signature]

अनुमोदक :- रंजना थालेकर

सही :- [signature]

अनुकुल संख्या------------- प्रतिकुल संख्या--------------- तटस्थ संख्या----------------

(ठराव/ सर्वानुमते/बहुमताने/मंजुर/नामंजुर)

[signature]

पिठासीन अधिकारी

6

# विरार शहर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा

---

**सभा ठराव क्र . ३१**

**विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक : १३/ ०४ /२०२६**

---

कामाचे नाव:- विरार (पु.) येथील गणेश नगर येथे गुरु सावली ते भोईरपाडा चौक ते पर्यंत कॉक्रीटीकरण करणे.

लेखाशिर्ष:- रस्ता बांधकाम योजनेचे नाव :-

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ३६,१९,६९३/-

तांत्रिक मान्यता रक्कम :- रु. ३६,१९,६९३/-

निविदा रक्कम :- रु. ३६,१९,६९३/-

प्रशासकीय मान्यता आदेश/ ठराव क्र.:- १३८८ दिनांक :- ११/१०/२०२४

प्रशासकीय मान्यतेची रक्कम :- रु. ३६,१९,६९३/-

सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता रक्कम :- रु.३०,५७,९१७/- (अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-)१५.५२% कमी दराने)

तांत्रिक मान्यता क्र. दिनांक :- प्र.शहर अभियंता पृ.क्र.१४/८७ सन २४-२५ दि.११/१०/२०२४

ई- टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/८७९/२०२५, दि.२७/१०/२०२५
कार्यकारी अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक :- दि. ११/१०/२०२४

वृत्तपत्राचे नाव व पृष्ठ क्रमांक :- १ दै. प्रहार 2. दै.नरवीर चिमाजी 3. दै.फ्रि प्रेस जर्नल

ई - टेण्डरींग व्दारे निविदा प्रिपरेशनची तारीख:- दि. ११/१०/२०२४ पासुन ते दि. २५/१०/२०२४

ई - टेण्डरींग व्दारे निविदा स्विकारण्याची तारीख:- दि. २८/१०/२०२५ दु.३.०१ पर्यत

विहीत मुदतीत ऑन लाईन प्रकीयेव्दारे प्राप्त निविदा :- ५

ई - टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा):- दि. २८/१०/२०२४

व्दितीय लिफाफा उघडल्याची दिनांक :- २६/११/२०२५

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी (ज्यांच्या डीएससीने निविदा उघडल्यात्यांची नावे नमुद करावीत):-
प्र. शहरअभियंता

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | निविदाकार | निविदा दर | निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॅर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल | एल १,एल २, एल ३ इत्यादी नुसार क्रम निश्चीत करुन नोंदवावा | एल १ चा तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. मेहुल वर्तक | १५.५२ % कमीदराने | पावती क्र.१९४१७६ दि.०४/१२/२०२५ | एल १ | |
| २ | मे. माही कंन्स्ट्रक्शन | १४.८० % कमी दराने | | | |
| ३ | मे. आकाश एंटरप्रायजेस | अंदाजपत्रकीय दराने | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | मनिष पाटील | ४.५० % जास्त दराने | | | |
| ५ | रोशन राम जाधव | ५.५० % जास्त दराने | | | |

उपरोक्त निविदांची तुलना करता **मे. मेहुल वर्तक** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा** (-)१५.५२ % **कमी दराने** हा तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहे.

सदर कामाचे हे अंदाजपत्राकीय दरापेक्षा (-)१५.५२ % **कमी दराने** असल्याने सिक्युरिटी म्हणून रु.२,९०,०००/- इतक्या रक्कमेची परफॉर्मन्स सिक्युरीटी रक्कम पा.क्र. १९४१७६ दि. ०४/१२/२०२५ अन्वये भरणा केलेली आहे.

तरी **मे. मेहुल वर्तक** यांच्या **अंदाजपत्रकापेक्षा** (-)१५.५२ % **कमी दराच्या (रक्कम रु.** ३०,५७,९१७/-) निविदेस सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (अ) नुसार देण्यास व त्यांच्याबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणे कामी मा.स्थायी समिती सभेपुढे मंजुरीस्तव सविनय सादर.

**प्रस्तावाचा निर्णय** - सदर बाबत सांगोपन चर्चा होऊन निविदांची तुलना करता **मे. मेहुल वर्तक हयांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा** (-)१५.५२ % **(रक्कम रु.** ३०,५७,९१७/-) दर कमी व योग्य आहे. तरी मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (अ) अन्वये हया कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त हयांनी मंजुरी दिली आहे. या कामी म.न.पा तर्फे कायदेशीर बाबींची पूर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

---

सुचकाचे नाव :- नरेंद्र पाटील

सही :-

अनुमोदक :- स्वप्नील कवळी

सही :-

अनुकुल संख्या------------प्रतिकुल संख्या---------------तटस्थ संख्या---------------

(ठराव/ सर्वानुमते/बहुमताने/मंजुर/नामंजुर)

पिठासीन अधिकारी

# वसई – विरार शहर महानगरपालिका


मुख्य कार्यालय, विरार प, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०३

दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com


(7)

## मा. स्थायी समिती सभा.

ठराव क्र. ३२

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- ९३ /०४ /2026

**<u>प्रस्तावाचा विषय</u>** :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ए) बोळींज कार्यक्षेत्रातील क्रिडा संकुल, म्हाडा मैदान, विरार (प.) येथील मिनी सरस विक्री व प्रदर्शन 2025-26 ठिकाणी वीज जोडणी करणेंकरिता केबल व्यवस्था करणे...

1. अंदाजपत्रकीय रक्कम :- 3,39,324/- (PWD -CSR 2023-24)

2. प्रस्तावाचा मजकूर :- कोकण विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पालघर, उमेद व वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने दि.12/03/2026 ते दि.16/03/2026 या कालावधीमध्ये विभागीय, जिल्हास्तरीय मिनी सरस विक्री व प्रदर्शन 2025-26 क्रिडा संकुल, म्हाडा मैदान, विरार (प.) येथे आयोजित करण्यात आले होते.

सदर मिनी सरस विक्री व प्रदर्शन ठिकाणी जिल्हा परिषद, पालघर यांचेमार्फत मंडप व प्रकाश व्यवस्था करण्यात आली होती. याकरिता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मार्फत 85 कि.वॅट क्षमतेचे वीज मिटर बसविण्यात आले होते. तसेच, वीज कपंनीमार्फत मुख्य वीज पुरवठा घेणेकरिता 4 कोर 120 sq.mm ची 230 मीटर केबलची आवश्यकता असल्याचे दि.09/03/2026 रोजीच्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभाग, जि.प. (पालघर) यांनी कळविले होते.

त्यानुसार, दि.09/03/2026 रोजी मा.आयुक्त महोदय यांनी सदर कार्यक्रमबाबतच्या आढावा बैठकीत महानगरपालिका विद्युत विभागामार्फत सदर ठिकाणी मुख्य वीज पुरवठा करणे कामी केबल व त्याअनुषंगिक इतर विद्युत्तीय कामे करणेबाबत निर्देश देण्यात आले.

सदरचे काम 3 दिवसांत तातडीने करावयाचे असल्याने 120 sq.mm केबल -230 मीटर, मिनी पिलर- 1 नग व अर्थिंग-2 नग इ.साहित्य बसविणेंकरिता रक्कम रु.3,39,324/- अंदाजपत्रक तयार करणेंत आले असुन, त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसुची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार काम करणेंस दि.11/03/2026 रोजी मा.आयुक्त महोदय यांची मान्यता घेणेंत आली.

त्याअनुषंगाने, प्राप्त मान्यतेनुसार विद्युत विभागाकडील अनुभवी ठेकेदार मे. साई वैभव इलेक्ट्रिकल यांस अंदाजपत्रकीय दराने कार्यादेश देऊन काम करुन घेण्यास व येणाऱ्या रक्कम रु.3,39,324/- खर्चास मान्यता दिली आहे व सदरचे काम तातडीने दि.12/03/2026 रोजी पर्यंत पुर्ण करून दिले आहे.

सदर, नियोजित केलेला कार्यक्रम दि.12/03/2026 ते दि.16/03/2026 पर्यंत सुस्थितीत पार पाडला. तसेच सदर ठिकाणी तात्पुरती वीज जोडणी करण्याकरीता 120sq.mm ची 230 मी. केबल व इतर विद्युतीय साहित्य कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्युत विभाग, मुख्यालय येथे पुर्न:वापर करीता जमा करण्यात आले आहे.

तरी, वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ए) बोळींज कार्यक्षेत्रातील क्रिडा संकुल, म्हाडा मैदान, विरार (प.) येथील मिनी सरस विक्री व प्रदर्शन 2025-26 ठिकाणी वीज जोडणी करणेंकरीता केबल व्यवस्था करणेकामी मे.साई वैभव इलेक्ट्रिकल यांनी दिलेल्या आदेशानुसार सदरचे काम पुर्ण केले असून, रक्कम रु.3,39,324/- इतका खर्च झाला आहे. सदर कामी केलेली कार्यवाही व झालेला खर्चाची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील 1949 अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

3. ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ए) बोळींज कार्यक्षेत्रातील क्रिडा संकुल, म्हाडा मैदान, विरार (प.) येथे दि.12/03/2026 ते दि.16/03/2026 दरम्यान मिनी सरस विक्री व प्रदर्शन 2025-26 करीता वीज जोडणी व त्या अनुषंगिक विद्युतीय कामे करणेकरीता सादर केलेले प्रस्तावाचे अवलोकन केले असता, विद्युत विभागामार्फत करणेंत आलेली सर्व कार्यवाहीस कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजुरी प्रदान करीत आहे.

सुचकाचे नाव:- रंजना थालेकर

स्वाक्षरी:- RThaker

अनुमोदकाचे नाव:- स्वप्नील कवळी

स्वाक्षरी:- [signature]

अनुकुल संख्या ---—---------------प्रतिकुल संख्या ---—--------------तटस्थ संख्या---—---------------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूरी/नामंजूर

[signature]

(प्रविण शेट्टी)
पिठासीन अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

13/64

(8)

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, विरार
## मा. स्थायी समिती सभा

स्थायी समिती सभा ठराव क्र.:- ३२ सभा सुचना क्र. ४१ दिनांक :- १२/०२/२०२६

---

**विषय :-** स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत विविध अभियानांतर्गत नागरीकांचा सहभाग व अभिप्राय (Citizen Feedback) नोंदविणेकामी अभिकर्त्यांची नियुक्ती करणेस होणाऱ्या खर्चास मा. स्थायी समिती सभेपुढे आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० चा प्रारंभ करण्यात आला आहे. सदर अभियान दि.०२/१०/२०२१ ते दि.०१/१०/२०२६ पर्यंत राबविले जाणार आहे. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्रमांक-स्वमअ-२०२२/प्र.क्र.७३/नवि ३४ दि. १५/०७/२०२२ मधिल अभियानाच्या घटकातील ४.४ नुसार माहिती शिक्षण प्रसार व जनजागृती/ नागरीकांच्या सवयींमधिल बदल (Information Education Communication/ Behaviuor Change Communication) सदर घटकाचा उद्देश "कचरामुक्त" शहरांचे ध्येय साध्य करण्याकरिता लोक चळवळ तीव्र करणे आणि स्वच्छ वर्तन संबंधित कृती संस्थांत्मक करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरीकांपर्यंत पोहोचवून जागृकता निर्मीती सुनिश्चित करणे हा आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार या घटकांतर्गत केंद्र व राज्याच्या निधीचे प्रमाण ६०:४० निर्धारीत केला जाईल. राज्याने प्राप्त रक्कमेपैकी किमान ५०% रक्कम राज्यांना द्यावी. त्याकरिता माहिती शिक्षण प्रसार व जनजागृती/ नागरीकांच्या सवयींमधिल बदल चे उपक्रम राबविणे आवश्यक आहे.

दि.११/०७/२०२४ रोजीचे पत्रान्वये वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विविध कार्यक्रम, समारंभ, घडामोडी, योजना, नागरीकांपर्यंत पोहचविणे मा. आयुक्त, मा. अतिरिक्त आयुक्त यांचा Facebook Live द्वारे नागरीकांशी संवाद, नागरीकांसाठी आवाहने, नागरीकांचे अभिप्राय नोंदविणे, स्वच्छता व आरोग्य संबंधित उपयुक्त माहिती, जनजागृतीपर संदेश, स्वच्छ सर्वेक्षण अभियान, विविध बैठका/ कार्यशाळा/ प्रशिक्षण इत्यादी बाबतचे रंगीत छायाचित्रे, व्हिडीओ चित्रीकरण प्रसिद्धी देणेबाबत (To Do Awareness on Digital Platform Of Vasai Virar City Municipal Corporation) व Creative Art Work तयार करणे इ. विविध उपक्रम अधिक प्रभावीपणे राविणेकरिता शासनामार्फत सन २०२५-२६ व सन २०२६-२७ या दोन वर्षांकरिता १० कोटी निधी उपलब्ध करून देणेबाबत वसई विरार शहर महानगरपालिकेचा कृती आराखडा दि.११/०७/२०२४ रोजी राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांना सादर करण्यात आला होता.

वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा प्रशा-४ दि.३०/०७/२०२४ अन्वये संचालनालयाकडून SNA SPARSH प्रणालीवर माहिती, शिक्षण प्रसार व सवयींमधिल बदल (IEC व BC) व क्षमता बांधणी, कौशल्य विकास व ज्ञान व्यवस्थापन (CB, SD & KAM) घटकांमध्ये केंद्र व राज्य हिश्याचा **mhsbm२.com** प्रणालीवर IEC व CB घटकांचा शिल्लक निधी **SNA SPARSH** प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात येईल परंतु, राज्य अभियान संचालक यांनी DPR नुसार निधीचा पहिला हफ्ता पुर्णपणे खर्च करून त्याकामाचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतर निधीचा दुसरा हफ्ता वितरीत करण्यात येईल असे ई-मेल द्वारे कळविण्यात आले होते. दि. २०/११/२०२५ रोजी IEC घटकाकरिता सन २०२४-२५ मध्ये अभिकर्त्यांची नियुक्ती करून ५०% काम पुर्ण झाल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर करण्यात आले आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.), महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.राअस/स्वमअ/२०२५-२६/१३३०, दि.०६/१०/२०२५ अन्वये संचालनालयाकडून SNA SPARSH प्रणालीवर स्वच्छ भारत अभियानाच्या (नागरी) २.० घटकांतर्गत प्रणालीवर झालेल्या कामाचे बिले/ देयके सादर केल्यानंतर निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

"F:\loukik pc data\लौकिक\HEMALI Mdm\IEC FUND\सीटीझन फिडबॅक\ठराव.docx"

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचेकडिल दि.३१/१२/२०२५ रोजीचे पत्र नुसार स्वच्छ भारत अभियानाच्या घटाकांतर्गत गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय, केंद्र शासन द्वारे प्रसिध्द स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ ची मार्गदर्शिका अन्वये शहरात विविध जनजागृती संबंधित उपक्रम राबविणे आवश्यक आहे. सदर मार्गदर्शिकेमध्ये ODF/ ODF+/ODF++/Water+ करिता १००० गुण, कचरा मुक्त शहर (Garbage Free Cities) करिता १००० गुण व प्रत्यक्ष स्थळ पाहणी व नागरीकांच्या प्रतिसादाकरिता (On ground assessment including citizen feedback) १०,५०० गुण आहेत.

**तक्ता क्र. १**

| अ.क्र. | | निकष | गुण |
|---|---|---|---|
| १ | | ODF/ ODF+/ODF++/Water+ | **१०००** |
| २ | | Garbage Free Cities | **१०००** |
| ३ | | On ground assessment including citizen feedback | **१०,५००** |
| | ३.१ | Visible Cleanliness | १५०० |
| | ३.२ | Segregation, Collection & Transportation of waste | १००० |
| | ३.३ | Solid Waste Management | १५०० |
| | ३.४ | Access to Sanitation | १००० |
| | ३.५ | Used Water Management | १००० |
| | ३.६ | Mechanization of desludging services | ५०० |
| | ३.७ | Advocacy for Swachhata | १५०० |
| | ३.८ | Ecosystem Strengthening & Institutional Parameter | १००० |
| | ३.९ | Overall Welfare of sanitation Workers | ५०० |
| | ३.१० | Citizen Feedback & Grievance Redressal | १००० |
| **TOTAL** | | | **१२,५००** |

वरीलप्रमाणे स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ करिता १२,५०० गुणांकांचा समावेश आहे. स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ चे टुलकिट नुसार "नागरीकांचा सहभाग व अभिप्राय व तक्रार निवारण" (Citizen Feedback & Grievance Redressal) या घटकाकरिता मार्गदर्शिकेमधिल १०% असे एकुण १००० गुण आहेत.

**तक्ता क्र. २**

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १ | Citizen Feedback | **५००** |
| २ | Grievance Redressal | **५००** |
| **TOTAL** | | **१,०००** |

वरीलप्रमाणे स्वच्छतेबाबत पारदर्शकता, कचऱ्याचे वर्गिकरण संकलन आणि वाहतुक, घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छतेची उपलब्धता, सांडपाणी व्यवस्थापन, मलजल उपसा करणाऱ्या सेवांची यांत्रिकीकरण, स्वच्छतेचा प्रचार, एकल वापर प्लास्टिक बंदी, RRR उपक्रम, सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज, हाताने मैला उचलणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस प्रतिबंध, कचरामुक्त शहर, हागणदारीमुक्त शहर तसेच इतर उपक्रमांबाबत नागरीकांमध्ये जागृकता निर्माण करणे आवश्यक आहे तसेच नागरीकांचे स्वच्छ सर्वेक्षण मध्ये सहभाग नोंदविणेकामी नागरीकांचा प्रतिसाद घेणकामी एकुण १,००० गुण मार्गदर्शिकेमध्ये नमुद आहेत.

तक्ता क्र. १ व २ नुसार वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये वरील बाबी नागरीकांपर्यंत पाहोचवीणे, नागरीकांसाठी आवाहने, नागरीकांचे अभिप्राय नोंदविणेकामी अभिकर्त्याची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

सदरकामी जनजागृती करणाऱ्या नामांकित संस्थेकडून दरपत्रक मागविणेकामी अभिकर्त्यांस पत्र देणेत आले होते. त्याअनुषंगाने नामांकित संस्थांनी दरपत्रके सादर केली आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ३**

| अ.क्र. | दरपत्रकदाराचे नाव | प्रति अभिप्राय दर रक्कम रूपये (जीएसटी सह) |
|---|---|---|
| १. | मे. अलाईड सोल्युशन सर्विसेस | रू. १०/- |
| २. | मे. पायवाट प्रोडक्शन | रू. १२/- |
| ३. | मे. माधव सोशल वेलफेअर सोसायटी | रू. ९.९०/- |

तरी, उपरोक्त तक्ता क्र. ३ नुसार **मे. माधव सोशल वेलफेअर सोसायटी** यांचे **रक्कम रू. ९.९०/- (प्रति अभिप्राय)** इतका लघूत्तम दर धरला असता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये वरील बाबी नागरीकांपर्यंत पाहोचवीणे, नागरीकांसाठी आवाहने, नागरीकांचे **एकुण १,००,०००/- इतके (FeedBack)** अभिप्राय नोंदविणेकामी अभिकर्त्याची नियुक्ती करणेकरिता होणारा एकुण खर्च रक्कम रू. **९,९०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये नऊ लक्ष नव्वद हजार मात्र)** इतका अपेक्षित आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये वरील बाबी नागरीकांपर्यंत पाहोचवीणे, नागरीकांसाठी आवाहने, नागरीकांचे **एकुण १,००,०००/- इतके (FeedBack)** अभिप्राय नोंदविणेकामी अभिकर्त्याची नियुक्ती करणेकरिता **रू.९,९०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये नऊ लक्ष नव्वद हजार मात्र)** इतका खर्च होत असून सदर खर्च लेखासांकेतांक क्र.३४०-२५७० "स्वच्छ भारत अभियान एक व दोन" या लेखाशिर्षकांतर्गत भागविता येईल.

सदरचे उपक्रम राबविणेकरिता अभिकर्त्याची नियुक्ती करून केलेल्या कामाच्या देयकाचा प्रस्ताव मंजूरी केल्यानंतर SNA SPARSH प्रणालीवर सादर करावयाचा आहे. तद्नंतर झालेल्या कामाचा निधी SNA SPARSH प्रणालीवर माहिती, शिक्षण प्रसार व सवयींमधिल बदल (IEC व BC) व क्षमता बांधणी, कौशल्य विकास व ज्ञान व्यवस्थापन (CB, SD & KAM) घटकांमध्ये केंद्र शासनामार्फत (६०%) व राज्य शासनाचे (४०%) असा निधी SNA SPARSH प्रणालीवर IEC (SLS Code : MH-५६६) या घटकांतर्गत उपलब्ध होऊन होणारा खर्च भागविणेत यावा.

तरी, वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत विविध अभियानांतर्गत नागरीकांचा सहभाग व अभिप्राय (Citizen Feedback) नोंदविणेकामी अभिकर्त्याची नियुक्ती करणेस व होणाऱ्या अंदाजित रक्कम **रू.९,९०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये**

**नऊ लक्ष नव्वद हजार मात्र)** एवढ्या खर्चास एवढ्या खर्चास महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम ७३ ड नुसार मा. स्थायी समितीची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी घनकचरा व्यवस्थापन विभागाने प्रस्ताव सादर केला आहे.

**निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत विविध अभियानांतर्गत नागरीकांचा सहभाग व **एकुण १,००,०००/- इतके (FeedBack)** अभिप्राय नोंदविणेकामी अभिकर्त्याची नियुक्ती करणेस व होणाऱ्या रक्कम **रू.९,९०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये नऊ लक्ष नव्वद हजार मात्र)** एवढ्या खर्चास मा. स्थायी समिती सभा प्रशासकिय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाचे नांव :- नरेंद्र पाटील

व स्वाक्षरी :-

अनुमोदकाचे नांव :- आलमगीर डायर

व स्वाक्षरी :-

अनुकुल संख्या –   प्रतिकुल संख्या –   तठस्थ संख्या –

ठराव / सर्वानुमते / ~~बहुमताने~~ / मंजूर / ~~नामंजूर~~

(प्रविण शेट्टी)
पिठासीन अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.)

**मा.स्थायी समिती सभा सूचना क्र.०७**

**दि.२०/०४/२०२६**

प्रति,

सन्मा. श्री / श्रीमती ..........................................

स्थायी समिती सदस्य / सदस्या,

वसई-विरार शहर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेची मा.स्थायी समिती सभा शुक्रवार, दि.२४/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता **'मा.स्थायी समिती सभागृह'**, ४ था मजला, वसई-विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, यशवंत नगर, विरार (प.) येथे खालील विषयावर निर्णय घेणेसाठी आयोजित करण्यांत आली आहे.

तरी सदर सभेस कृपया हजर रहावे हि विनंती.

**मा.स्थायी समिती सभा विषय पत्रिका**

१. मागील दि.१३/०४/२०२६ रोजीच्या सभेचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.

२. श्री. प्रकाश दत्ताराम साटम, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची फौजदारी गुन्हयाच्या खटल्यात निर्दोष मुक्तता झाल्याने त्यांचा निलंबन कालावधी हा सेवा कालावधीत धरुन वेतनभत्ते अदा करणेबाबत.

३. वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील दिवाणमान १०० फीट रोड जवळील टेम्पोस्टँड येथे आर.सी.सी. क्रॉसींग कल्वर्ट बांधणे.

४. दि.०१/०६/२०२६ ते दि. ३१/०५/२०२९ (३ वर्ष) करीता कोफराड (नंदाखाल) तलावात मासे संवर्धन व मासेमारी करीता ठेका पध्दतीने लिलाव करण्याकरीता दरपत्रक मागविणे व जाहिर नोटीस प्रसिद्धी करणेकरीता प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

५. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने नरवीर चिमाजीअप्पा यांनी १७३९साली वसईचा किल्ला सर केल्याबद्दल विजयोस्तव साजरा करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

६. वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (एफ) पेल्हार कार्यक्षेत्रातील वालईपाडा ते मुख्य रस्ता ते रोहन पाटील यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसह संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

(मा.सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,

(विश्वनाथ तळेकर)

महानगरपालिका सचिव

वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

**मा.स्थायी समिती सभा**

मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. २५ सभा सुचना क्र. दिनांक: २४/४/२०२५

---

**विषय :- श्री. प्रकाश दत्ताराम साटम, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची फौजदारी गुन्हयाच्या खटल्यात निर्दोष मुक्तता झाल्याने त्यांचा निलंबन कालावधी हा सेवा कालावधी धरुन पुढील वेतनभत्ते अदा करणेबाबत.**

श्री. प्रकाश दत्ताराम साटम, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचेविरुध्द फिर्याद दाखल केल्यामुळे त्यांचेवर नालासोपारा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ३०५/२००२ भारतीय दंड विधान कलम ४२०,४०६ व ४०९ सह कलम ३४ अन्वये नालासोपारा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला होता. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने अति.मुख्य न्यायदंडाधिकारी, वसई येथे नि.फौ.खटला क्र. २२२/२००३ अन्वये खटला दाखल करण्यात आलेला होता.

श्री. प्रकाश दत्ताराम साटम, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली होती. कार्यालयीन आदेश क्र. सा.प्र.वि./९०/२००४, दिनांक ३१/०५/२००४ अन्वये मा.न्यायालयाचे निर्णयास अधिन राहून त्यांना सेवेत पुन:स्थापित करुन घेण्यात आले आहे.

मा.न्यायालयाने सदर खटल्याचा निर्णय दि. ०७/१०/२०२४ रोजी दिला असून त्यामध्ये फिर्यादीने सादर केलेल्या साक्षीदारांच्या साक्षी पुराव्यावरुन व फिर्यादीने फिर्यादीमधील मजकूराप्रमाणे न्यायालयासमक्ष पुरावा सादर केलेला नाही.

सबब न्यायालयाने खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

१. आरोपी क्र.१ श्री. प्रकाश साटम यांची भारतीय दंड विधान कलम ४२०,४०६ व ४०९ सह कलम ३४ या गुन्हयांतून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.
२. आरोपी क्र. १ चे जांतमुचलके फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ अ नुसार पुढील सहा महिन्यांच्या कालावधीकरीता पुढे कायम करण्यात येत आहे.

सदर मा.न्यायालाच्या अनुषंगाने अपिल दाखल न करण्याचे कारण काय ?असे मा.आयुक्तांच्या निर्देशावर विधी विभागाने खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

१. सदरचा नियमित फौजदारी खटला क्र. २२२/२००३ हा महाराष्ट्र सरकार पोलीस निरीक्षक यांचे मार्फत दाखल करण्यात आलेला होता.
२. सदरच्या खटल्यामध्ये तत्कालीन नालासोपारा नगरपरिषद ही वादी नव्हती.
३. सदरच्या खटल्यामध्ये अंतिम निर्णयाची सुनावणी झाल्यानंतर महाराष्ट्र सरकार पोलीस निरीक्षक यांचे वकिलामार्फत सदर बाबतीत अपील दाखल करणे गरजेचे होते.
४. सदरच्या खटल्यामध्ये आस्थापना विभाग ही वादी नसल्याने अपील दाखल करणे देखील शक्य नव्हते.

उपरोक्तप्रमाणे विधी विभागाने अभिप्राय नोंदविलेले असून श्री. प्रकाश दत्ताराम साटम, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) हे दिनांक ३१/०७/२०२५ (मध्यान्नोहत्तर) रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले आहेत.

सबब श्री. प्रकाश दत्ताराम साटम, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची फौजदारी गुन्हा खटल्यातून निर्दोष मुक्तता झाल्याने तत्कालीन नालासोपारा नगरपरिषदेच्या कार्यालयीन आदेश क्रमांक बा.वि./२५५७/०२, दिनांक ०७/०९/२००२ नुसार तीन वर्षासाठी दोन वेतनवाढी रोखण्याची शिक्षा रद्द करुन वेतनवाढी (मुक्त) पूर्ववत करुन त्या कालावधीतील थकबाकी (फरक) अदा करणे आवश्यक आहे.

श्री. प्रकाश दत्ताराम साटम, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची फौजदारी गुन्हयाच्या खटल्यात निर्दोष मुक्तता झाल्याने तत्कालीन नालासोपारा नगरपरिषदेच्या कार्यालयीन आदेश क्रमांक बा.वि./२५५७/०२,दि.०७/०९/२००२ नुसार तीन वर्षासाठी दोन वेतनवाढी रोखण्याची शिक्षा रद्द करुन त्या वेतनवाढी (मुक्त) पूर्ववत करुन त्या कालावधीतील त्यांना वेतनातील देय थकबाकी (फरक) अदा करणेबाबतच्या प्रस्तावावर विचार विनिमय करण्यात आला.

**ठरावाचा निर्णय :-** श्री. प्रकाश दत्ताराम साटम, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची फौजदारी गुन्हयाच्या खटल्यात निर्दोष मुक्तता झाल्याने तत्कालीन नालासोपारा नगरपरिषदेच्या कार्यालयीन आदेश क्रमांक बा.वि./२५५७/०२,दि.०७/०९/२००२ नुसार तीन वर्षासाठी दोन वेतनवाढी रोखण्याची शिक्षा रद्द करुन त्या वेतनवाढी (मुक्त) पूर्ववत करुन त्या कालावधीतील त्यांना वेतनातील देय थकबाकी (फरक) अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणबाबतचा प्रस्ताव दि. २४/०४/२०२६ रोजीच्या स्थायी समितीच्या सभेस स्थगित ठेऊन पुढील सभेस सादर करण्यात यावा.

**सुचकाचे नांव** - नरेंद्र पाटील

व स्वाक्षरी –

**अनुमोदकाचे नांव** – जितेंद्र पाटील

व स्वाक्षरी – जितेंद्र

अनुकुल संख्या--------------- प्रतिकुल संख्या ------------------ तटस्थ संख्या --------

**ठराव / सर्वानुमते / ~~बहुमताने~~ / मंजूर / ~~नामंजूर~~**

(प्रविण शेट्टी)
**सभापती तथा पिठासीन अधिकारी**
**स्थायी समिती**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पश्चिम, जि. पालघर, पिन नं — ४०१३०३
दूरध्वनी — ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स — ०२५०-२५२५१०७
ई-मेल —vasaivirarcorporation@yahoo.com

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३६ | विभाग : सार्व. बांधकाम
सभा सुचना क्र. | दिनांक : २५ / ०४ /२०२६

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. २४ मध्ये दिवाणमान १०० फीट रोड जवळील टेम्पो स्टँड येथे आर.सी.सी. क्रॉसींग कल्वर्ट बांधणे कामी खालील तक्तयात नमूद नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांपैकी एक ठेकेदार यांच्या कडून जिल्हा दरसुची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करुन घेण्यासाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मा.स्थायी समिती सभापती तथा पिठासीन अधिकारी हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वॉर्ड क्र. २४ मधील दिवाणमान १०० फुटी रस्ता टेंम्पो स्टँण्ड येथील अस्तित्वातील कल्वर्ट पुर्णपणे नादुरुस्त झाले असून येथून दळण वळण करणे प्रभावित झालेले आहे. या रस्त्यावरुन अवजड वाहनांचा वावर असल्याने सदर वाहतूक बंद ठेवण्यात आलेली आहे. सदर रस्ता दिवाणमान, १०० फुटी रस्ता या परिसराला ओमनगर, क्रिष्णा टाऊनशिप व इतर परिसराशी जोडतो. तरी सदरचे कल्वर्ट लवकरात लवकर बनविणे व रस्ता वाहतूकीसाठी खुला करणे आवश्यक आहे. सदर कामाकरीता माजी महापौर सो. व स्थानिक नगरसेवक यांनी मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने सदर जागेचे प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर काम तात्काळ प्रभावाने पुर्ण करणे आवश्यक आहे.

वर नमूद ठिकाणी करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग राज्य दर सूची नुसार कामाचे अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत सार्व. बांधकाम विभागात नोंदणीकृत ठेकेदारां पैकी खालील नमूद अनुभवी ठेकेदार यांचे मार्फत क्रॉसिंग कल्व्हेट/ समकक्ष या प्रकारच्या कामाच्या पध्दतीचे एक काम ज्याची रक्कम अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ८०% पेक्षा जास्त आहे. किंवा दोन सारख्या पध्दतीची कामे ज्यांची काम निहाय किंमत अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ५० % पेक्षा जास्त आहे अशी कामे पुर्ण करण्यात आली आहेत.

| अ.क्र. | सार्व. बांधकाम विभाग नोंदणीकृत ठेकेदारयांचे नाव | अनुभवाचे काम | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे. निखील शरद परब | १. प्रभाग समिती जी वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.१०५ मध्ये नायगाव पुर्व, जूचंद्र येथील साई एनक्लेव्ह सोसायटी ते घर होतो ऐसा कार्यालयापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | रु. १,०५,२३,१९८/- | काम समाधान कारक पुर्ण |
| | | २. प्रभाग समिती जी वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०५ मध्ये नायगाव पुर्व, जुचंद्र येथील | रु. १,५४,३७,०५१/- | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ऋतू गार्डन सोसायटी ते मुख्य रस्त्यापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे व रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे | | |
| २. | मे. राम एंन्टरप्राईजेस | १. वॉर्ड क्र. ८८ मधील गोखिवरे चिंचपाडा येथील क्लासीक स्ट्राइपस कंपनी शेजारील आर.सी.सी. क्रॉसिंग कल्व्हर्ट बांधणे. | रु. १,०९,७६,८४०/- | काम समाधान कारक पुर्ण |
| ३. | मे. ईरा एंन्टरप्राईजेस | १.प्रभाग समिती आय अंतर्गत साकाई नगर येथे मयुरेश कुबल यांच्या घरापासून ते शंकर यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे | रु. ७९,६०,७५५/- | काम समाधान कारक पुर्ण |
| | | २. प्रभाग समिती आय अंतर्गत वरचा माळा कॅन्सर सेंटर लगत आर.सी.सी. नाला बांधणे | रु. ७६,२३,६१६/- | |
| ४. | मे. हमिद जे. शेख | १.प्रभाग समिती (ई) क्षेत्रातील प्रभाग क्र. ५७ मधील समेळ शिवमंदिर शेजारील लहान पुलाचे बांधकाम करणे. | रु.८,९३,८३,९४८/- | काम समाधान कारक पुर्ण |

वर नमूद केलेल्या मान्यता प्राप्त ठेकेदाराने तसे काम करणे बाबत समर्थता दर्शविलेली आहे.

तरी उपरोक्त महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा २.२ नुसार निविदा न काढता वर नमूद केलेले नोंदणीकृत ठेकेदार मे. निखिल शरद परब यांच्याकडून जिल्हा दरसूची तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करुन घेण्यासाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मा.स्थायी समिती सभापती तथा पिठासीन अधिकारी यांच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. २४ मध्ये दिवाणमान १०० फीट रोड जवळील टेम्पो स्टॅंड येथे आर.सी.सी. क्रॉसींग कल्वर्ट बांधणे कामी रक्कम रु. १,३७,०५,०८०/-इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत असून या ठिकाणी तातडीने काम करणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा २.२ नुसार निविदा न काढता वर नमूद केलेले नोंदणीकृत ठेकेदार मे. निखिल शरद परब यांच्या कडून जिल्हा दरसूची तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करुन घेण्यासाठी संविदा करण्यास मंजूरी देत आहे. तसेच सदर कामाचे प्रत्येक Stage/ टप्प्यावरील Geo tagged photographs सादर करणे आवश्यक आहे. त्या शिवाय देयक अदा केले जाणार नाही.

सुचकाचे नांव : महेश सरवणकर

व स्वाक्षरी ---------------

अनुमोदकाचे नांव : नरेंद्र पाटील

व स्वाक्षरी ---------------

अनुकुल संख्या ___—___ प्रतिकुल संख्या ___—___ तटस्थ संख्या ___—___

ठराव/सर्वानुमते/बहुताने/मंजुर/नामंजुर

(प्रविण शेट्टी)
स्थायी समिती सभापती
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

* (आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई विरार शहर महानगपालिका


मुख्य कार्यालय, विरार (प.), जि. पालघर, पिन नं. ४०१३०३

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७

ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com


## स्थायी समिती सभा

ठराव क्रं. ३६ विषय क्र. दिनांक :- २५/०७/२०२६

**प्रस्तावाचा विषय :** **दि.०१/०६/२०२६ ते दि. ३१/०५/२०२९ (३ वर्ष) करीता कोफराड (नंदाखाल) तलावात मासे संवर्धन व मासेमारी करीता ठेका पध्दतीने लिलाव करण्याकरीता दरपत्रक मागविणे व जाहिर नोटीस प्रसिद्धी करणेकरीता प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणे बाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर :** वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती अ, बोळींज अंतर्गत कोफराड विभागातील नंदाखाल तलाव मत्स्यसंवर्धन करुन मासेमारी करीता ठेका पद्धतीने देण्याकरीता मा.प्रशासकीय ठराव क्र. २५२ दि.०८/१२/२०२० अन्वये तलाव लिलावाची ई-निविदा मागविणे कामी प्रशासकीय वित्तीय मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार दि.१०/१२/२०२० ई-निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. सदर मुदतीत एकही ई-निविदा प्राप्त न झाल्यामुळे दि.१९/१२/२०२० रोजी प्रथम मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतरही एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे दि.२९/१२/२०२० रोजी द्वितीय मुदतवाढ देण्यात आली. द्वितीय मुदत वाढीतही एकच ई-निविदा प्राप्त झाल्याने सदर निविदा प्रक्रिया रद्द करून दि.०७/०१/२०२१ ते दि.१३/०१/२०२१ पर्यत फेर निविदा स्विकारण्याबाबत ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली. सदर फेर निविदा मुदतीत एकच ई-निविदा प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. सी ए टी /२०१७प्र.क्र.०८/इमार दि.२७/०९/२०१८ प्रकरण क्र. ४:३ अन्वये फेर ई-निविदा मागविण्यानंतर सदर निविदेमध्ये एक किंवा त्यापेक्षा जास्त निविदा आल्यास प्रथम लखोटा उघडण्याचे निर्णय देण्यात आलेला आहे. त्यानुसार नंदाखाल तलावाची निविदा आय डी क्र. ६३४१६३ यामध्ये फक्त एकच निविदा प्राप्त झालेली असून सदर निविदाधारकाच्या कागदपत्रांची पडताळणी केली असता कागदपत्रांची पूर्तता केल्याने लखोटा क्र. २ दि.१०/०२/२०२१ रोजी सांय ४:०० वाजता द्वितिय लखोटा उघडण्यात आला. लखोटा क्र. २ मध्ये प्राप्त झालेल्या निविदा धारक श्री. जेम्स अंतोन तुस्कानो यांचे नांवे रक्कम ३,९०,०००/- रुपयांस प्रशासकीय ठराव क्र.२८५ दि.२५/०६/२०२१ अन्वये दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२३ (३ वर्षे ) कालावधीकरीता ठेका मंजूर करण्यात आला.

सदर कालावधी दरम्यान कोफराड विभागातील नंदाखाल तलावाचे सुशोभिकरणाचे काम दि.१७/०९/२०१९ ते दि.२४/०५/२०२३ रोजी पर्यंत करण्यात आल्याने ठेकेदारास झालेल्या आर्थिक नुकसानी करीता मा.प्रशासकीय ठराव क्र.१३०७ दि.०८/१०/२०२४ अन्वये दि.३१/०५/२०२६ पर्यंत तलावात मासे संवर्धन व पकडणेकामी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर मुदतवाढ देताना ठेकेदाराकडून दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२३ (३ वर्षे) या कालावधीतील ठेक्याची रक्कम रु.३,९०,०००/- वसुल करण्यात आलेली आहे.

सदर तलावाची मुदतवाढ दि.३१/०५/२०२६ रोजी समाप्त होत असून महानगरपालिकेच्या उत्पन्नाची बाब विचारात घेता सदर तलाव लिलावाची प्रक्रिया करणे गरजेचे आहे. परंतु या अगोदर सन २०२५-२६ या काळात झालेल्या तलाव लिलाव निविदेतील मुळ रक्कमेवर वार्षिक १०% वाढ करुन तीन वर्षात ३०% वाढ केल्याने सदर लिलाव प्रक्रियेत निविदाधारक सहभागी होत नसल्याचे दिसून आलेले आहे. त्यामुळे लिलाव प्रक्रियेत मुळ रक्कमेवर तीन वर्षाकरीता १०% वाढ करुन लिलाव करण्यात आलेला असून लिलाव प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. त्यानुसार उप आयुक्त यांनी दि.२५/०२/२०२६ रोजी घेतलेल्या बैठकी दरम्यान तलाव लिलावाबाबत घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये सूचना करुन तीन वर्षाकरीता मुळ रक्कमेवर १०% वाढ करुन प्रस्ताव सादर करणेबाबत सूचित केल्यानुसार कोफराड (नंदाखाल) तलाव लिलावाच्या रक्कमेची दि.०१/०६/२०२६ ते दि.३१/०५/२०२९ (३ वर्ष) या कालावधीकरीता मागणी तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तलावाचे ठिकाण | सन २०२१-२०२३ (३ वर्षे) वर्षातील मुळ रक्कम | दि.०१/०६/२०२६ ते ३१/०५/२०२९ करीता १०% वाढ रक्कम | दि.०१/०६/२०२६ ते ३१/०५/२०२९ करीता एकूण मागणी रक्कम १०% वाढी सह |
|---|---|---|---|---|
| १ | कोफराड (नंदाखाल) | रु.३,९०,०००/- | रु.३९,०००/- | रु.४,२९,०००/- |

वरीलप्रमाणे दि.०१/०६/२०२६ ते दि.३१/०५/२०२९ (३ वर्षे) या कालावधीकरीता मासे संवर्धन व मासेमारी करुन विक्री करण्यासाठी ठेका देणेकामी दरपत्रक मागणी करणे व नोटीस बोर्डावर प्रसिद्धी करणेकामी येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीपुढे सादर.

**ठरावाचा निर्णय** वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'अ' बोळींज अंतर्गत येणा-या कोफराड (नंदाखाल) तलावाची मुदत दि.३१/०१२/२०२३ रोजी संपलेली असून दि.०१/०१/२०२४ ते दि.३१/०५/२०२६ पर्यंत तलावाच्या सुशोभिकरणामुळे मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर मुदतवाढ दि.३१/०५/२०२६ रोजी संपत आहे. तरी कोफराड (नंदाखाल) तलाव दि.०१/०६/२०२६ ते दि.३१/०५/२०२९ (३ वर्षे) या कालावधीकरीता मासे संवर्धन व मासेमारी करुन विक्री करण्या करीता ठेका देणेकामी रक्कम रु.४,२९,०००/- (अक्षरी र.रु.चार लक्ष एकोणतीस हजार मात्र) या रक्कमेवर दरपत्रक मागणी करणे व नोटीस बोर्डावर प्रसिद्धी करणेकामी येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

---

सूचकाचे नांव – जितेंद्र पाटील

व स्वाक्षरी -

अनुमोदकाचे नांव – आलमगीर डागर

व स्वाक्षरी -

अनुकूल संख्या ------------------ प्रतिकुल संख्या ---------------------- तटस्थ संख्या --------------------

ठराव /सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(प्रविण शेट्टी)

सभापती तथा पिठासीन अधिकारी

स्थायी समिती

वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई विरार शहर महानगरपालिका**
मुख्यालय, विरार (पश्चिम)
**मा.स्थायी समिती सभा**

ठराव क्र. ३८ दिनांक २४/०४/२०२६

---

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत २८८ वा वसई विजयोत्सव दिनाचे आयोजन करणेकामी व आयोजनाकामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकुर :-** उपरोक्त विषय व संदर्भियानुसार सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने वसई किल्ल्यामध्ये ऐतिहासिक वास्तु व पर्यटनाला चालना देणेसाठी दरवर्षी माहे मे या महिन्यामध्ये वसई विजयोत्सव दिन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून वसई किल्ल्याचा इतिहास व येथील पर्यटन याची माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचविण्यास मदत होत आहे, तसेच याठिकाणी पर्यटक संख्येत वाढ होवून येथील संस्कृतीचे जतन व संवर्धन होण्यास देखील मदत होत असून दरवर्षी या कार्यक्रमास भेट देणाऱ्या नागरिकांच्या संख्येत लक्षणीय वाढ होताना दिसत आहे.

यावर्षी बुद्धपोर्णिमा सोमवार दिनांक.०१ मे २०२६ रोजी आहे. त्यामुळे ०१ मे २०२६ ते ०३ मे २०२६ असा कार्यक्रम कालावधी निश्चित केल्यास मोठ्या संख्येने नागरिक व पर्यटक वसई किल्ल्यात येण्याची शक्यता आहे. याकरिता बौद्धपौर्णिमेचे औचित्य साधून वसई विजयोत्सव दिन या कार्यक्रमाचे आयोजन सलग तीन दिवसांचे म्हणजेच (दिनांक. ०१ मे, २०२६ ते ०३ मे,२०२६) या कालावधीत आयोजित करणे शक्य होणार आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत २८८ वा वसई विजयोत्सव दिन कार्यक्रमाच्या आयोजनाकामी खालील बाबींवर खर्च होणार आहे.

१. किल्ला बांधणी स्पर्धा व त्यांची पारितोषिके,चित्र प्रदर्शन,श्री.वज्रेश्वरी मंदिर ते वसई किल्ला मशाल, वाहन रॅली,शोभायात्रा, पारंपारिक खाद्य पदार्थ जत्रा, पाहुणे कलाकार, व्याख्याते, परिक्षक,कलाकार यांना निवास व्यवस्था आणि मानधन, मशाल यात्रा व शोभा यात्रेत सहभागी होणारी मंडळे,रथ सजावट,मशाल, रांगोळी कलाकार यांचे मानधन, चित्ररथ वाहन भाडे, शाल, श्रीफळ, गुच्छ-हार,फटाके, ढोल ताशा वादक मानधन,किल्ला सफर मानधन,सूत्रसंचालन मानधन,स्वयंसेवक मानधन,विविध स्पर्धा आयोजन व पारितोषिक, शस्त्र व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.
२. हॅन्डबील,निमंत्रण पत्रिका, प्रशस्ती पत्रक, बॅनर्स,बॅच, स्टिकर्स/पोस्टर्स, माहितीपत्रक छपाई, इव्हेन्ट, टोपी, स्मृती चिन्हे, जाहिरात, रेल्वे जाहिरात, रेडिओ / एफएम जाहिरात व प्रसिद्धी व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.
३. मंडप/स्टेज व्यवस्था,कमानी/ फ्लाईंग साऊंड सिस्टीम,विद्युत रोषणाई, आसन व्यवस्था, बॅरेकेडिंग,फोटोग्राफी, व्हिडिओ चित्रिकरण,जीमी झीप कॅमेरा शुटींग, मोठी स्क्रीन, पीपल काऊंन्टीग डिवाइस, सेक्युरिटी व इतर अनुषंगीक बाबी, कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.
४. वाहनभाडे, रहिवास भाडे व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.
५. चहापान/सिलबंद पाणी, निवास व भोजन व्यवस्था तसेच इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.
६. ऐतिहासिक व दुर्मिळ वस्तू संग्रहाचे प्रदर्शन, अन्य प्रदर्शने व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.
७. तीन दिवस सांस्कृतीक व करमणुकीचे कार्यक्रम, बालजत्रा,लेझर शो,मर्दानी खेळ तसेच इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.

वरील नमुद अ.क्र १ ते ७ या मधील बाबीवर होणाऱ्यां खर्चाचे अंदाजपत्रक खालीलप्रमाणे

| अ.क्र | कामाचे नाव | सन २०२६/२७ यावर्षी चा प्रस्तावीत खर्च अंदाजीत |
|---|---|---|
| १ | शस्त्र, नाणी, आरमार, दुर्ग प्रतिकृती, मोडीलिपीतील पुरातन दस्तएवज इ.प्रदर्शन, शस्त्रांची प्रत्याक्षिके, ऐतिहासिक विषयावर व्याख्यान इ कार्यक्रम मानधन (एकुण तीन दिवस) | ३८५००० |
| २ | सांस्कृतिक कार्यक्रम मानधन (शिवरायांच्या जीवनप्रवासावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम) | ३०२५०० |
| ३ | सांस्कृतिक कार्यक्रम मानधन (महाराष्ट्र दर्शन सांस्कृतिक कार्यक्रम) | ८०००० |
| ४ | सांस्कृतिक कार्यक्रम मानधन (मी मराठी सांस्कृतिक कार्यक्रम) | ९४४००० |
| ५ | कार्यक्रमाचे आर्टवर्क व प्रमोशन व्हिडिओ मानधन | १९९९९९ |
| ६ | बालजत्रा खर्च (एकुण तीन दिवस) | ३८३५०० |
| ७ | कार्यक्रमासाठी विविध स्पर्धा बक्षिसे व मानधन, वाहनभत्ता खर्च, रहिवास खर्च | ५००००० |
| ८ | सन्मानचिन्ह, शॉल, नारळ, फुलाचे गुच्छ, फुलाचा हार, स्मारकाकरीता फुलाची सजावट , विद्युत रोषणाई, टोपी खर्च | ३००६०५ |
| ९ | चहापान/सिलबंद पाणी, निवास व भोजन व्यवस्था व इतर अनुषंगीक बाबी | ५००००० |
| १० | व्हिडिओग्राफी व फोटोग्राफी, एल.ई.डी.स्क्रीन (तीन दिवस) | ४००००० |
| ११ | बॅनर छपाई व जाहिरात खर्च | ३००००० |
| १२ | कार्यक्रमाकरिता हॅन्डबील, स्टिकर,प्रमाणपत्र तसेच पत्रिका छपाई खर्च | ५०००० |
| १३ | मंडप,स्टेज, बॅराकेटींग, व्ही.आय.पी खुर्ची / सोफे,कारपेट,ट्रस्ट,विदयुत जनित्र व इतर अनुषंगीक बाबी वरील खर्च | ३१५४३९६ |
| | **एकुण अंदाजीत रक्कम** | **७५०००००** |

वरील तक्ता नुसार अ.क्र. ८ ते अ.क्र.१३ चे दर भांडार विभागातील मंजुर निविदाधारकामार्फत पुरविण्यात येईल.

सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात आयोजित कार्यक्रम हा सलग तीन दिवसांचा असून यामध्ये सांस्कृतीक कार्यक्रम, खानपान, मंडप व्यवस्था, ऐतिहासिक व दुर्मिळ वस्तू संग्रहाचे प्रदर्शन व अनिवार्य असलेला बाबी वरील इतर अनुषंगीक खर्चामध्ये नैसर्गिक व बाजार भावातील वाढ लक्षात घेता या वर्षी नियोजित २८८ वा वसई विजयोत्सव दिन **(सलग तीन दिवस)** कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करणेस अंदाजित एकुण रक्कम रुपये ७५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

प्रस्तावात नमुद बाब वार्षीक दर मंजुर असलेल्या निविदाकारांमार्फत कार्यादेश देवून सदरील कामे करुन घेणेस तसेच ज्या कामांकरिता वार्षिक दर मंजुर नाहीत अशा कामांकरिता दरपत्रके / ई-निविदा मागविणे व कामाची देयके प्रदान करणेंस मंजुरी आवश्यक आहे.

तसेच सांस्कृतीक व करमणुकीचे कार्यक्रमासाठी ई-निविदा व दरपत्रके मागविणे शक्य नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील प्रकरण ५ संविदा मधील कलम २ (२) मधील तरतुदीनुसार निविदा न मागविता किंवा मागविल्यानंतर त्याचे कडील ज्या कोणत्याही निविदा येतील त्या न स्विकारता संविदा करण्यास प्राधिकृत करता येणे बाबत तरतुद आहे.

त्यास अनुलक्षुन संदर्भ क्र. ३ ते ८ मधील प्राप्त दरपत्रकांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | संदर्भ क्र. | दरपत्रक धारकाचे नाव | कार्यक्रमाचा तपशील | दरपत्रकातील रक्कम / मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | ३ | मोहीनी नृत्यकला केंद्र तर्फे श्रीम.सारिका मकरंद सावे | शस्त्र, नाणी, आरमार, दुर्ग प्रतिकृती, मोडीलिपीतील पुरातन दस्तएवज इ.प्रदर्शन, शस्त्रांची प्रत्याक्षिके, ऐतिहासिक विषयावर व्याख्यान इ कार्यक्रम मानधन (एकुण तीन दिवस) **(एकुण तीन दिवस)** | ३८५००० |
| २ | ४ | मोहीनी नृत्यकला केंद्र तर्फे श्रीम.सारिका मकरंद सावे | शिवरायांच्या जीवनप्रवासावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाचे मानधन | ३०२५०० |
| ३ | ५ | विशाल डान्स ग्रुप तर्फे श्री.रोशन प्रदीप घरत | महाराष्ट्र दर्शन सांस्कृतिक कार्यक्रमाचे मानधन | ८०००० |
| ४ | ६ | मे.नंदेश उमप | मी मराठी सांस्कृतिक कार्यकामाचे मानधन | ९४४००० |
| ५ | ७ | मे.राजेंद्र केशव वनमाळी | कार्यक्रमाचे आर्टवर्क व प्रमोशन व्हिडिओ मानधन | १९९९९९ |
| ६ | ८ | मे.फन अनलिमिडेट | बालजत्रा करिता पॉपकॉर्न, कँडी, इन्फ्लेटेबल फुटबॉल डार्ट, वेल्को वॉल, मिकी स्लाइड, झिगझॅग स्लाइड, एअरप्लेन राइड, बंगी जंपिंग, ट्रेन, सफारी पार्क, रॉक क्लाइंबिंग, ऑब्स्टॅकल स्लाइड, बंगी रन, एलिमिनेटर, मिकी मिनी मॅस्कॉट, लायन टायगर मॅस्कॉट **(एकुण तीन दिवस)** | ३८३५०० |

त्यानुसार वरील तक्ता नुसार अ.क्र.०१ ते अ.क्र.०६ चे दर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील प्रकरण ५ संविदा मधील कलम २ (२) अन्वये मंजुर करुन सर्व संबंधीतांचा करारनामा करुन त्यांना कामाचा कार्यादेश देणेंस मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात सत्कार व इतर समारंभ व्याख्यानमाला, वकृत्वस्पर्धा, ग्रंथ संमेलन, गुणवंत शिक्षक सत्कार, व्यक्ती/संस्थासाठी महानगरपालिका भुषण पुरस्कार, महापौर चषक स्पर्धा व इतर सांस्कृतिक कार्यक्रम आणि क्रीडा कार्यक्रम या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रुपये १८ कोटी इतकी तरतूद केली असून सदरचा खर्च नमुद लेखाशिर्षामधून भागविणे शक्य आहे. तसेच या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६६ मधील पोटकलम ९ अन्वये तरतूद आहे.

तरी प्रस्तावात नमुद प्रमाणे शुक्रवार दिनांक ०१ मे,२०२६ ते रविवार दिनांक ०३ मे,२०२६ या कालावधीकरिता वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत वसई चिमाजी अप्पा स्मारक येथे २८८ वा वसई विजयोत्सव दिन कार्यक्रम आयोजित करणेंस व त्याकामी होणा-या अंदाजीत एकुण रक्कम रुपये ७५,००,०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या अंतिम मान्यतेसाठी ठेवणेंस आदेशास्तव सादर.

**प्रस्तावाचा निर्णय / ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत २८८ वा वसई विजयोत्सव दिन कार्यक्रम शुक्रवार दिनांक ०१ मे,२०२६ ते रविवार दिनांक ०३ मे,२०२६ या कालावधीकरिता आयोजन करणेकामी व आयोजनाकामी येणा-या अंदाजीत एकुण रक्कम रुपये ७५,००,०००/- इतक्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

प्रस्तावात नमुद बाब क्र.१ ते ७ याकामी वार्षीक दर मंजुर असलेल्या निविदाकारांमार्फत कार्यादेश देवून सदरील कामे करुन घेणेस तसेच ज्या कामांकरिता वार्षिक दर मंजुर नाहीत अशा कामांकरिता दरपत्रके/ ई-निविदा मागविणे व कामाची देयके प्रदान करणेंस मंजुरी आवश्यक असल्याने ही सभा सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तावात नमुद तक्त्यामधील अ.क्र.०१ ते अ.क्र.०६ चे दर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील प्रकरण ५ संविदा मधील कलम २ (२) अन्वये मंजुर करुन सर्व संबंधीतांचा करारनामा करुन त्यांना कामाचा कार्यादेश देणेंस ही सभा सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

सुचकाचे नाव - नरेंद्र पाटील

व स्वाक्षरी -

अनुमोदकाचे नाव - अभय कक्कड

व स्वाक्षरी-

अनुकूल संख्या -------------------- प्रतिकुल संख्या-------------------- तटस्थ संख्या---------------------

ठराव /सर्वानुमते /बहुमताने /मंजुर /नामंजुर

(प्रविण शेट्टी)
पिठासीन अधिकारी
स्थायी समिती
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पश्चिम, जि. पालघर, पिन नं – ४०१३०३
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल –vasaivirarcorporation@yahoo.com

---

**सर्वसाधारण सभा ठराव क्र.** 39
**सभा सुचना क्र.**

**विभाग : सार्व. बांधकाम**
**दिनांक :** २५/०५/२०२६

---

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (एफ) पेल्हार कार्यक्षेत्रातील वालईपाडा ते मुख्य रस्ता ते रोहन पाटील यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसह संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

| | | |
|---|---|---|
| ई- निविदा क्र. | :- | 2025_VVCMC_1234226_7 |
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- | रु.३,१२,६७,१९६/- |
| सुधारीत प्रशासकीय मान्यतेची रक्कम | :- | रु. २,४७,०१,०८५/- |
| तांत्रिक मान्यता रक्कम | :- | रु.३,१२,६७,१९६/- |
| ई-निविदा रक्कम | :- | रु.३,१२,६७,१९६/- |
| प्रशासकीय मान्यता | :- | मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे ठराव क्र. १३९८ दिनांक १६/१०/२०२५ |
| तांत्रिक मंजूरी | :- | दि. १५/१०/२०२५ |
| ई –टेण्डरींग निविदा सुचना प्रसिध्दी तारीख | :- | दि. २८/१०/२०२५ |
| वृत्तपत्रातील निविदा प्रसिध्दी दि. | :- | दि. २८/१०/२०२५ |
| वृत्तपत्राचे नांव | :- | १.. दै. महाराष्ट्र टाईम्स, २. दै. सकाळ, ३. दै. जागल्या ४. दै. जागरूक टाईम्स ५. दै. खबरे आजतक ६. दै. मिड डे ७. दै. फ्री प्रेस जर्नल |
| ई-टेण्डरींगद्वारे निविदा प्रिपरेशनची तारीख | :- | दि. २८/१०/२०२५ |
| ई-टेण्डरींगद्वारे निविदा सुचना स्विकारण्याची तारीख | :- | दि. ०४/११/२०२५ |
| विहीत मुदतीतऑनलाईन प्रिक्रियेद्वारे प्राप्त निविदा | :- | ०६ |
| प्रथम लखोटा उघडल्याची दिनांक | :- | दि. ०६/११/२०२५ |
| प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी | :- | १. कार्यकारी अभियंता<br>२. प्र. शहर अभियंता |
| द्वितीय लखोटा उघडल्याची दिनांक | :- | दि. २८/११/२०२५ |

**प्राप्त दर**

| अ. क्र. | निविदाकार | निविदा दर | निविदेचा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल | एल १, एल २, एल ३ इत्यादी नुसार क्रम निश्चित करुन नोंदवावा | एल १ चा तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| १. | मे. राजाराम कंस्ट्र | (-)२१.०० % कमी दराने | | एल १ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २. | मे. कृतिका कंस्ट्रक्शन | (-) १.२७ % कमी दराने | | एल २ | |
| ३. | मे.क्षत्रिय इंन्फ्रास्ट्रक्चरप्रा. लि. | (-) १.११% कमी दराने | | एल ३ | |
| ४. | मे. एस. एस. इन्फ्रास्ट्रक्चर | (-) २.५० % कमी दराने | | एल ४ | |
| ५. | मे. डी.जी.पाटील कंस्ट्रक्शन्स | (-) ०.५१ % कमी दराने | | एल ५ | |
| ६. | मे. बुधराणी बिल्डर्स | (-) ०.५० % कमी दराने | | एल ६ | |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. राजाराम कंस्ट्रक्शन** यांची **अंदाजपत्रकीय दरापेक्षा** (-) **२१.०० %** कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता **मे. राजाराम कंस्ट्रक्शन** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा** (-) **२१.०० %** कमी दराची निविदा ही तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहेत.

दि.   /   /२०२६ रोजी अन्वये मा. निविदा समितीने **मे. राजाराम कंस्ट्रक्शन** यांच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा** (-) **२१.०० %** कमी दराच्या निविदेच्या मान्यतेसाठी शिफारस करणेत आली आहे.

तरी **मे. राजाराम कंस्ट्रक्शन** यांच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा** (-) **२१.०० %** कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मा. स्थायी समिती सभेपुढे संविदा करणेकरीता मंजूरीस्तव शिफारस असे.

**ठराव/ निर्णय :-** सदर कामास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे ठराव क्र. १३९८ दिनांक १६/१०/२०२५अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिद्ध करून सकारात्मक दृष्टया **मे. राजाराम कंस्ट्रक्शन** यांची निविदा **अंदाजपत्रकापेक्षा (-)२१.००% कमी दराने** निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(अ) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा. आयुक्त यांनी मा.सर्वसाधारण सभेकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा. सर्वसाधारण सभा महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा. आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

---

सुचकाचे नांव : नरेंद्र पाटील

व स्वाक्षरी

अनुमोदकाचे नांव : रंजना यालेकर

व स्वाक्षरी

अनुकुल संख्या — प्रतिकुल संख्या — तटस्थ संख्या —

ठराव/सर्वानुमते/बहुतानें/मंजूर/नामंजुर

(प्रविण शेट्टी)

(सभापती तथा पिठासीन अधिकारी)

स्थायी समिती सभा

वसई-विरार शहर महानगरपालिका